या मेलिंगमध्ये दोन कायदेशीर नोटीस आहेत: **(1)** अमेरिकन **Lufthansa** क्लास ऍक्शन समझोत्याची नोटीस; व **(2)** कॅनेडियन **Lufthansa** क्लास ऍक्शन समझोत्याची नोटीस.

आपण एकापेक्षा अधिक क्लासेसचे सदस्य असू शकता.

कृपया दोन्ही नोटीसा वाचा.

# ही अमेरिकन LUFTHANSA क्लास ॲक्शन समझोत्याची नोटीस आहे

---

**LUFTHANSA समझोता क्लासच्या सर्व सदस्यांसाठी महत्वाची नोटीस**

**कंपन्यांच्या मुख्य कार्यालयांना/वकिलांना अग्रेषित करा (लागू असल्यास)**

**UNITED STATES DISTRICT COURT**
**EASTERN DISTRICT OF NEW YORK**
**(अमेरिकेचे जिल्हा न्यायालय**
**न्यूयॉर्कचा पूर्व जिल्हा)**

| | |
|---|---|
| IN RE (वापरात असलेले)<br><br>AIR CARGO SHIPPING SERVICES ANTITRUST LITIGATION (हवाई मालवाहतूक सेवा मक्तेदारीविरोधी कायदा)<br><br>मॉडेल क्र. 1775 | मास्टर फाईल 06-MD-1775 (JG) (VVP) |

## प्रस्तावित क्लास ॲक्शन समझोत्याची नोटीस प्रतिवादी DEUTSCHE LUFTHANSA AG, LUFTHANSA CARGO AG, व SWISS INTERNATIONAL AIR LINES LTD. रक्कम 85 दशलक्ष डॉलर

**प्रति: ज्यांनी मालाच्या अग्रेषकांमार्फत हवाई मालवाहतुक सेवा खरेदी केल्या असतील त्यांच्यासह अशा सर्व व्यक्ती, ज्यांनी जानेवारी 1, 2000 ते सप्टेंबर 11, 2006 या कालावधीमध्ये कोणत्याही हवाई मालवाहतुकदाराकडून अमेरिकेअंतर्गत, अमेरिकेमध्ये अगर अमेरिकेमधून मालवाहतुकीसाठी हवाई मालवाहतूक सेवा खरेदी केल्या होत्या.**

**कृपया ही संपूर्ण नोटीस काळजीपूर्वक वाचा. सध्या न्यायालयात प्रलंबित असलेल्या एका खटल्यामुळे आपल्या हक्कांवर परिणाम होऊ शकतो. ही नोटीस आपल्याला आपल्या क्लास ॲक्शनसंबंधीच्या पर्यायांबद्दल माहिती देते, यात आपल्याला जर 85 दशलक्ष डॉलरच्या समझोता निधीमध्ये सहभागी व्हायचे असेल तर आपण काय करायला हवे, याचाही उल्लेख आहे.**

ही नोटीस Rule 23 of the Federal Rules of Civil Procedure and an Order of the United States District Court for the Eastern District of New York (दिवाणी कामकाजाच्या मध्यवर्ती अधिनियमांमधील नियम 23 व न्यूयॉर्कच्या पूर्व जिल्ह्यासाठीचे अमेरिकेचे जिल्हा न्यायालय) ("न्यायालय") च्या हुकुमानुसार देण्यात येत आहे.

या नोटीसचा उद्देश आपल्याला प्रतिवादी Deutsche Lufthansa AG, Lufthansa Cargo AG, व Swiss International Air Lines Ltd. (एकत्रितरीत्या "Lufthansa") विषयीचा प्रलंबित क्लास ॲक्शनचा खटला ("ॲक्शन") आणि त्यांच्यासह ॲक्शनचा आंशिक समझोता याबद्दल माहिती देणे हा आहे. ॲक्शन आरोप करते की Lufthansa व या समझोत्यामध्ये समाविष्ट नसलेले अन्य प्रतिवादी (खाली स्पष्ट केलेले) यांनी

हवाई मालवाहतूक सेवांसंबंधीच्या (खाली स्पष्ट केलेले) अमेरिकेच्या मक्तेदारीविरोधी कायद्यांचा व राज्य कायद्यांचा भंग केला. Lufthansa ने त्यांच्या विरुद्धचा अमेरिकेअंतर्गत, अमेरिकेमध्ये अगर अमेरिकेमधून हवाई मालवाहतुकीविषयीचा दावा सोडवण्यासाठी 85 दशलक्ष डॉलर देण्याचे व अन्य प्रतिवादींविरुद्ध दावे चालवण्यात मदत करण्याचे मान्य केले आहे.

डिसेँबर 12, 2008 रोजी न्यायालय Lufthansa समझोता करार मान्य करावा वा नाही, यावर विचार करण्यासाठी एक सार्वजनिक निष्पक्षपातदर्शक सुनावणी करेल. या निष्पक्षपातदर्शक सुनावणीचा उद्देश Lufthansa समझोता करार न्याय्य, योग्य व पुरेसा आहे अगर नाही हे ठरवणे, या असेल.

आपले पर्याय या नोटीसमध्ये पुढे वर्णन केले आहेत व त्यांचा हा गोषवारा आहे:

1. **Lufthansa समझोत्याच्या क्लासमध्ये राहणे व दाव्याचे प्रपत्र सादर करणे.** आपल्याला ही नोटीस टपालाने मिळली असल्यास या नोटीसबरोबर आपल्याला दाव्याचे प्रपत्र आधीच मिळाले आहे. आपण ही नोटीस ऑनलाईन वाचत असल्यास अगर तिची प्रत आपल्याला Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) दाव्यांच्या प्रशासकांकडून टपालाऐवजी अन्य मार्गाने मिळाली असल्यास आपण दाव्याचे प्रपत्र www.aircargosettlement.com वर ऑनलाईन मागवू शकता अगर Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) दाव्यांच्या प्रशासकांना दूरध्वनी करुन मागवू शकता: अमेरिका अगर कॅनडा (विनामूल्य) 1 (800) 749-3518; अगर आंतरराष्ट्रीय (मूल्यसहित) 1 (941) 906-4822. Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) च्या सर्व विनामूल्य व मूल्यसहित दूरध्वनी क्रमांकांची देशानुसार संपूर्ण सूची या नोटीसच्या मेलिंगमध्ये जोडली आहे, तसेच ही सूची ऑनलाईनही उपलब्ध आहे.

2. **Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून नाव काढून टाकण्याची लेखी विनंती करणे.** आपण नाव काढून टाकण्याची विनंती केल्यास आपल्याला Lufthansa समझोत्यात सहभागी होता येणार नाही. Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून आपण नाव काढून न घेतल्यास जर न्यायालयाने Lufthansa समझोत्याच्या कराराला मान्यता दिली तर आपणावर मुक्तता बंधनकारक राहील. निष्कासनासंबंधीची माहिती खाली दिली आहे आणि येथे ऑनलाईन उपलब्ध आहे: www.aircargosettlement.com.

3. **Lufthansa समझोत्याच्या क्लासमध्ये राहणे पण आक्षेप घेणे.** Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून आपण नाव वगळण्याची विनंती न केल्यास आपण Lufthansa समझोत्याच्या क्लासमध्ये राहू शकता व दाव्याचे प्रपत्र सादर करु शकता, पण त्याचवेळी Lufthansa समझोत्याच्या कोणत्याही भागावर आक्षेप घेऊ शकता. आक्षेप दाखल करण्याची अंतिम मुदत नोव्हेँबर 12, 2008 आहे.

4. **काहीच न करणे.** Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून आपण नाव वगळण्याची विनंती न केल्यास आणि दाव्याचे प्रपत्र सादर न केल्यास आपण Lufthansa समझोत्याच्या निधीमधून पैसे मिळण्यास पात्र ठरणार नाही व मुक्ततेमध्ये दिलेल्या दाव्यांमधून Lufthansa ला मुक्त कराल.

## I. खटल्याची पार्श्वभूमी

### A. <u>क्लास ऍक्शनचा खटला म्हणजे काय?</u>

क्लास ऍक्शनचा खटला म्हणजे असा खटला की ज्यामध्ये काही प्रातिनिधिक वादी स्वतःच्या व त्यांच्यासारख्याच परिस्थितीतील अन्य व्यक्तींच्या वतीने प्रतिवादींविरुद्ध खटला चालवतात. असे प्रातिनिधिक वादी, न्यायालय व क्लासचे प्रतिनिधित्व करणारे वकील, अशा सर्वांवर हे पाहण्याची जबाबदारी असते की क्लसच्या सर्व सदस्यांच्या हितसंबंधांचे पुरेसे प्रतिनिधित्व होत आहे. महत्वाचे म्हणजे समझोत्याच्या

क्लासचे सदस्य हे समझोत्याच्या क्लासच्या वकिलांच्या फीसाठी अगर खटल्याचा खर्चासाठी वैयक्तिकरीत्या जबाबदार नसतात. क्लास ॲक्शनमध्ये वकिलांच्या फी अगर खटल्याचा खर्च समझोत्याच्या निधीमधून दिले जातात व त्यांना न्यायालयाची मान्यता मिळावी लागते.

Lufthansa बरोबरच्या या समझोत्यासारख्या प्रस्तावित समझोत्याचा करार जेव्हा क्लास प्रतिवादीबरोबर करतो, तेव्हा क्लासला नोटीस दिली जाणे व त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली जाणे न्यायालयाच्या दृष्टीने आवश्यक असते. मग न्यायालय इतर गोष्टींबरोबरच प्रस्तावित समझोता न्याय्य, योग्य व पुरेसा आहे वा नाही हे ठरवण्यासाठी सुनावणी घेते.

## B. <u>ॲक्शनचा गोषवारा</u>

या ॲक्शनमध्ये वादींचा आरोप आहे, की Lufthansa व अन्य प्रतिवादींनी हवाई मालवाहतूक सेवेचे दर परस्परसंमतीने अधिभार (अधिभार म्हणजे हवाई मालवाहतुकदार सामान्य हवाई मालवाहतूक दरांव्यतिरिक्त जे अधिक भार, विशिष्ट अतिरिक्त खर्चांपोटी लावतात, ते, उदाहरणार्थ, "इंधन अधिभार" अगर "सुरक्षा अधिभार") आकारुन ठरवणे, वाढवणे, तसेच राखणे अगर स्थिर ठेवणे यासाठी एकत्र येऊन संगनमत केले, व ज्यात वाढीव अधिभार आकारणे, हवाई मालवाहतुक सेवेच्या दरांमध्ये सूट देणे बंद करणे अगर रोखणे, परतावा आणि ग्राहकांच्या विभागणीबद्दल समझोता करणे या गोष्टी परस्परसंमतीने ठरवल्या व या सर्वांद्वारे अमेरिकेच्या मक्तेदारीविरोधी कायदा व राज्य कायदा चा भंग केला. वादींचा आरोप आहे की या कथित वर्तनाचा परिणाम म्हणून क्लासला हवाई मालवाहतूक सेवांसाठी या वर्तनाच्या अनुपस्थितीत जो खर्च आला असता, त्यापेक्षा जास्त खर्च आला. Lufthansa व्यतिरिक्त या खटल्यातील "प्रतिवादी" असे आहेत:

AC Cargo LP
Aerolineas Brasileiras S.A (d/b/a Absa Cargo Airline)
Air Canada
Air China Cargo Company Ltd. (d/b/a Air China Cargo)
Air China Ltd. (d/b/a Air China)
Air Mauritius Ltd.
Airways Corporation of New Zealand Ltd. (d/b/a Airways New Zealand)
Alitalia Linee Aeree Italiane S.p.A.
All Nippon Airways Co., Ltd.
Asiana Airlines, Inc.
Atlas Air Worldwide Holdings, Inc.
British Airways PLC
Cargolux Airlines International S.A.
Cathay Pacific Airways, Ltd.
DAS Air Ltd. (d/b/a Das Air Cargo)
El Al Israel Airlines
Emirates Airlines (d/b/a Emirates)
Ethiopian Airlines Corp.
Japan Airlines International Co., Ltd.
Kenya Airways Ltd.
KLM Royal Dutch Airlines
Korean Airlines Co., Ltd.
LAN Airlines S.A. (f/k/a LAN Chile S.A.)
Lan Cargo S.A.
Martinair Holland N.V.
Nippon Cargo Airlines Co., Ltd.
Polar Air Cargo, Inc.
Qantas Airways Ltd.
Scandinavian Airline Systems AB
Saudi Arabian Airlines, Ltd.
Singapore Airlines Cargo PTE, Ltd.
Singapore Airlines, Ltd.
Société Air France
South African Airways (Proprietary), Ltd.
Thai Airways International Public Co., Ltd.
Viação Aérea Rio-Grandense, S.A. ("VARIG")

वादींसह समझोता करार करुन Lufthansa या ॲक्शनमध्ये कोणत्याही अवैध वर्तनाचा आरोप मान्य करत नाही. Lufthansa ने वादींसह समझोता करार केला नसता तर Lufthansa ने वादींच्या दाव्यांविरुद्ध भरपूर युक्तिवाद केला असता. याखेरीज, Lufthansa चा U.S. Department of Justice Antitrust Division (अमेरिकन न्यायखात्याच्या मक्तेदारीविरोधी विभागाच्या) सौम्यता कार्यक्रमामध्ये प्रवेश केला आहे, ज्यानुसार ज्या कंपन्या सरकारी अन्वेषकांना सुरुवातीलाच बेकायदेशीर मक्तेदारीविरोधी कृत्ये दृष्टीस आणून देतात, त्यांच्याबद्दल Antitrust Criminal Penalty and Enhancement and Reform Act of 2004, Pub. L. No. 208-137,118 Stat 665 (June 22, 2004) ("ACPERA") (मक्तेदारीविरोधी गुन्हेगारी दंड व सुधारणा कायदा 2004, Pub. L. No. 208-137,118 Stat 665 (जून 22, 2004) ("ॲक्पेरा")) नुसार सौम्यता दाखवण्याची तरतूद आहे, ACPERA मध्ये दर्शवल्यानुसार Lufthansa ने वादींना पुरेसे सहकार्य केल्यास Lufthansa ची दिवाणी खटल्यामधील देयता मोठ्या प्रमाणात मर्यादित होते.

वादी अगर Lufthansa, कोणीच आपले म्हणणे सिद्ध केलेले नाही. वादींनी केलेले आरोप बरोबर आहेत किंवा नाही, अगर Lufthansa किंवा अन्य कोणीही प्रतिवादी कोणत्याही गैरवर्तनात गुंतले होते अगर नाही, यावर न्यायालय कोणतेही मत प्रदर्शित करत नाही.

### C. <u>Lufthansa समझोत्याच्या क्लासची व्याख्या</u>

एप्रिल 4, 2008, च्या हुकुमानुसार न्यायालयाने प्राथमिकरीत्या Lufthansa समझोत्याचा क्लास प्रमाणित केला व आदेश दिला, की Lufthansa समझोत्याच्या क्लासच्या ("Lufthansa समझोत्याच्या क्लासचे सदस्य") व्याख्येत बसणा-या व्यक्ती व संस्थांना ही नोटीस पुरवली जावी. Lufthansa समझोत्याच्या क्लासची व्याख्या अशी आहे:

> ज्यांनी मालाच्या अग्रेषकांमार्फत हवाई मालवाहतूक सेवा खरेदी केल्या असतील त्यांच्यासह अशा सर्व व्यक्ती व संस्था ज्यांनी जानेवारी 1, 2000 ते सप्टेंबर 11, 2006 या कालावधीमध्ये <u>कोणत्याही हवाई मालवाहतुकदाराकडून</u>, आणि/किंवा कोणाही नमूद केलेल्या अगर न केलेल्या सहभागींसह (एकत्रितरीत्या "प्रतिवादी") अमेरिकेअंतर्गत, अमेरिकेमध्ये अगर अमेरिकेमधून मालवाहतुकीसाठी हवाई मालवाहतुक सेवा (यापुढे "हवाई मालवाहतूक सेवा") खरेदी केल्या होत्या (अमर्यादितपणे विशेषतः Lufthansa सहित ऍक्शंसमध्ये नमूद केलेल्या सर्व प्रतिवादींसह). समझोत्याच्या क्लास(क्लासेस)मध्ये प्रतिवादी व त्यांचे मूळ कंपन्या, कर्मचारी, उपकंपन्या, संबंधित अधिकारी व सर्व सरकारी कंपन्या समाविष्ट नाहीत.

"हवाई मालवाहतूक सेवा" ची व्याख्या म्हणजे अमेरिकेअंतर्गत, अमेरिकेमध्ये अगर अमेरिकेमधून मालवाहतुकीसाठी हवाई मालवाहतुक सेवा.

कृपया लक्षात घ्या, की Lufthansa समझोत्याचा क्लास हा ऍक्शनमध्ये व्याख्या केलेल्या प्रस्तावित क्लासपेक्षा वेगळा आहे. Lufthansa समझोत्याच्या क्लासमध्ये ऍक्शनमध्ये प्रतिवादी म्हणून नमूद न केलेल्या हवाई मालवाहतुकदारांसहित <u>कोणत्याही हवाई मालवाहतुकदाराकडून</u> सेवा खरेदी केलेल्या व्यक्ती समाविष्ट आहेत.

## II. LUFTHANSA बरोबरच्या प्रस्तावित समझोत्याचा गोषवारा

प्रस्तावित Lufthansa समझोता कराराचे खालील वर्णन म्हणजे फक्त गोषवारा आहे. Lufthansa समझोता करार (करण्यात आलेल्या चार सुधारणांसहित) न्यायालयामध्ये या नोटीसमध्ये दिलेल्या पत्त्यावर फाईलवर असून Air Cargo Settlement (हवाई मालवाहतूक समझोत्याच्या) अधिकृत संकेतस्थळावर (www.aircargosettlement.com) उपलब्ध आहे.

Lufthansa समझोत्याच्या क्लासच्या वतीने वादींनी Lufthansa करार केला. Lufthansa ने 85 दशलक्ष डॉलर (अधिक जमा झालेले व्याज) देण्याचे व समझोत्याच्या क्लासच्या वकिलांना अन्य प्रतिवादींविरुद्ध खटले सुरु ठेवण्यासाठी सहकार्य देण्याचे मान्य केले आहे. Lufthansa ने दिलेले 85 दशलक्ष डॉलर अधिक जमा झालेले व्याज ("Lufthansa समझोता निधी") ही रक्कम अशा समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांसाठीच्या रकमेने कमी होऊ शकते की जे Lufthansa समझोत्याच्या क्लासमध्ये सहभागी राहिले असते व त्यांनी वैध दाव्यांची प्रपत्रे सादर केली असती तर त्यांना ती रक्कम मिळाली असती. पहा समझोता करार, परिच्छेद 46. तसेच Lufthansa ने जर Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून बाहेर पडणा-या एखाद्या व्यक्तीबरोबर अशा अधिक रकमेचा समझोता केला की जी त्या व्यक्तीला Lufthansa समझोत्यामधून मिळाली असती त्यापेक्षा जास्त आहे, तर Lufthansa ला Lufthansa समझोत्याच्या क्लासला आणखी पैसे द्यावे लागतील. पहा समझोता करार, परिच्छेद 65. ऍक्शनमध्ये Lufthansa समझोत्याच्या क्लासच्या वतीने करण्यात आलेल्या सर्व दाव्यांमधून Lufthansa ला मुक्त केले जाईल. ऍक्शन समझोता न करणा-या प्रतिवादींविरुद्ध कारवाई सुरु ठेवेल. तसेच ऍक्शन Lufthansa विरुद्ध, Lufthansa समझोता कराराच्या अटींनुसार मुक्त न झालेल्या सर्व आरोपित दाव्यांच्या बाबतीतही कारवाई सुरु ठेवेल.

A. सहकार्याच्या आवश्यक बाबी

Lufthansa समझोता करारानुसार Lufthansa च्या सहकार्यामध्ये खालील कागदपत्रांचे सादरीकरण अंतर्भूत आहे:

- अमेरिकेअंतर्गत, अमेरिकेमध्ये अगर अमेरिकेमधून हवाई मालवाहतुकीसाठी Lufthansa ने पुरवलेल्या हवाई मालवाहतूक सेवांच्या विक्रीसंबंधीची कागदपत्रे व साहित्य;

- दोन अगर अधिक प्रतिवादींदरम्यान हवाई मालवाहतूक सेवांच्या दर अगर ग्राहकांसंबंधी झालेल्या प्रत्यक्ष वा संभाव्य संपर्काविषयीची सर्व कागदपत्रे; व

- Lufthansa ने United States Department of Justice (अमेरिकेचे न्याय खाते), European Commission (युरोपियन कमिशन), अगर हवाई मालवाहतुक उद्योगाचे अन्वेषण करणा-या अन्य कोणत्याही राष्ट्रीय स्पर्धाविषयक अधिकारिणीला अमेरिकेअंतर्गत, अमेरिकेमध्ये अगर अमेरिकेमधून हवाई मालाच्या व्यापाराबद्दल पुरवलेले सर्व कागदपत्र (मात्र अशा अन्वेषणासाठी Lufthansa च्या वकिलांनी बनवलेले कागदपत्र सोडून).

Lufthansa ने याखेरीज असेही मान्य केले आहे की योग्य विनंती केल्यास Lufthansa वादींच्या दाव्यांशी संबंधित अन्य कागदपत्रेही सादर करु शकेल.

Lufthansa समझोता करानुसार तरतूद केलेल्या सहकार्यात Lufthansa ने ॲक्शनच्या कारवाईला मदत म्हणून शक्य असेल तितके नियमितपणे व गरजेनुसार समझोत्याच्या क्लासच्या वकिलांना भेटणेही अंतर्भूत आहे. या भेटींमध्ये अशी आवश्यकता आहे की Lufthansa ने या स्पर्धाविरोधी कृत्यासंबंधात माहित असलेली सर्व सत्ये स्वतः सविस्तर देऊ करावी.

Lufthansa ने मुलाखती, निवेदने अगर प्रतिज्ञापत्रे, अभिसाक्षी व खटल्यातील साक्षींसाठी Lufthansa चे असे सर्व वर्तमान व भूतपूर्व संचालक, अधिकारी, व कर्मचा-यांना उपलब्ध करुन देण्याचेही मान्य केले आहे की ज्यांच्या मुलाखती U.S. Department of Justice (अमेरिकेचे न्याय खाते), European Commission (युरोपियन कमिशन), अगर हवाई मालवाहतुक उद्योगाचे अंवेषण करणा-या अन्य कोणत्याही राष्ट्रीय स्पर्धाविषयक अधिकारिणीने घेतल्या होत्या. Lufthansa ने खटल्याच्या वेळी आणि/किंवा डिपोझिशनच्या वेळी किंवा प्रतिज्ञापत्रे अगर निवेदनांद्वारे असे प्रतिनिधी सादर करण्याची मान्य केले आहे की जे Lufthansa ने या ॲक्शनमध्ये सादर केलेले कागदोपत्री पुरावे व Lufthansa च्या हवाई मालवाहतुक सेवांच्या विक्री व/किंवा अधिभारांशी संबंधित कागदोपत्री पुरावे प्रमाणित करण्यास पात्र असतील.

B. मुक्तता

जेव्हा **LUFTHANSA** समझोता करार अंतिम स्वरुप घेईल तेव्हा आपण जर स्वतःला **LUFTHANSA** क्लास मधून निष्कासित केले नाही, तर आपण खाली दिलेल्या सर्व दाव्यांमधून **LUFTHANSA** ला मुक्त कराल आणि आपल्यावर **LUFTHANSA** समझोत्याच्या करारातील ही मुक्तता बंधनकारक असेल – जरी आपण दाव्याचे प्रपत्र सादर केले नाही अगर **LUFTHANSA** समझोत्याच्या निधीमध्ये सहभागी नसाल तरी.

Lufthansa च्या 85 दशलक्ष डॉलरच्या अदायगीच्या व Lufthansa च्या भरघोस सहकार्याच्या बदल्यात (Lufthansa समझोत्याच्या क्लासचे जे सदस्य स्वतःला निष्कासित करतील त्यांच्यासाठी ही रक्कम कमी होऊ शकते) Lufthansa समझोत्याच्या सदस्यांना समझोता करारात दिल्यानुसार खालील दाव्यांची मुक्तता बंधनकारक असेलः

**"दावे"** म्हणजे कोणतेही व सर्व कृती, खटले, दावे, हक्क, मागण्या, आरोप, कृतीची कारणे, मतभेद, कारवाया, नुकसाने, दुखापती, वकिलांच्या फी, खर्च, देणी, देये, निर्णय अगर उपाय (न्याय्य अथवा वैध).

**"मुक्तता केले जाणारे पक्ष"** चा अर्थ, सामायिकपणे व पृथकपणे Lufthansa, व तिचे सर्व वर्तमान व पूर्वीचे, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष, भूतपूर्व, वारस, मूळ कंपन्या, उपकंपन्या, विभाग, संबंधित, वारसदार, प्रबंधक, प्रशासक, व कोणतेही व सर्व भूतपूर्व, वर्तमान व भावी अधिकारी, संचालक, भागधारक, भागीदार, प्रतिनिधी, वकील, नोकर, कर्मचारी व अधिन्यासी. उपरोल्लिखित असूनही "मुक्तता केले जाणारे पक्ष" मध्ये अंतर्भूत नाहीतः (i) ऍक्शन्समध्ये पूर्वी अगर सध्या उल्लेखित कोणीही इतर प्रतिवादी; (ii) ऍक्शन्समध्ये नंतर अंतर्भूत केलेला अगर झालेला कोणीही इतर प्रतिवादी; (iii) संगनमतात सभागी असलेली इतर कोणीही व्यक्ती; आणि/किंवा (iv) Lufthansa चा कोणीही पूर्वीचा कर्मचारी, अधिकारी अगर संचालक ज्याने समझोत्याच्या क्लासच्या वकिलांच्या मुलाखती, निवेदने अगर प्रतिज्ञापत्रे, डिपोझिशन्स अगर खटल्याच्या साक्षीसाठीच्या सर्व योग्य विनंत्यांना सहकार्य न करण्याचे निष्पन्न झाले आहे (स्वतःवर दोष लावण्याच्या अधिकाराची मागणी म्हणजे सहकार्य न करण्याचे द्योतक समजले जाईल).

**"मुक्तता करणारे पक्ष"** चा अर्थ, सामायिकपणे व पृथकपणे, वादी व [Lufthansa] समझोत्याच्या क्लासचे सदस्य स्वतः व त्यांच्याद्वारे अगर त्यांच्यामार्फत वारसदार, प्रशासक, डिव्हायसी, भूतपूर्व, वारस, मूळ कंपनी, उपकंपनी, कोणत्याही प्रकारचा प्रतिनिधी, भागधारक, भागीदार, संचालक, कोणत्याही प्रकारे मालक, संबंधित, अधिन्यासी, प्रतिनिधी, कर्मचारी, कंत्राटदार वकील अगर विमादाता असल्याचा दावा करणारी कोणतीही व्यक्ती अगर वैधानिक व्यक्ती, ज्या खाली वर्णिलेल्या पद्धत व तारखेनुसार ऍक्शन्समधून वैधपणे व समयानुसार माघार घेणार नाहीत, आणि क्लासचे वकील स्वतः अथवा त्यांच्याद्वारे अगर त्यांच्यामार्फत वारसदार, प्रशासक, डिव्हायसी, भूतपूर्व, वारस, मूळ कंपनी, उपकंपनी, कोणत्याही प्रकारचा प्रतिनिधी, भागधारक, भागीदार, संचालक, कोणत्याही प्रकारे मालक, संबंधित, अधिन्यासी, प्रतिनिधी, कर्मचारी, कंत्राटदार वकील अगर विमादाता असल्याचा दावा करणारी कोणतीही व्यक्ती अगर वैधानिक व्यक्ती.

मुक्तता करणारे पक्ष हे मुक्तता केली जाणा-या पक्षांना Lufthansa, अन्य कोणाही हवाई मालवाहतुकदार (अमर्यादपणे, ऍक्शंसमध्ये नाव असलेल्या प्रतिवादींसह) व/किंवा संगनमतात सहभागी असलेल्या उल्लिखित अगर अनुल्लिखित व्यक्तींनी अमेरिकेअंतर्गत, अमेरिकेमध्ये अगर अमेरिकेमधून हवाई मालवाहतुक करण्यासाठी पुरवलेल्या हवाई मालवाहतूक सेवांशी कोणत्याही प्रकारे संबंधित अशा दर अथवा परताव्याशी संबंधित (आणि विशेषत, अमर्यादपणे, असे दावे जे कोणत्याही प्रकारे मालवाहतुकीचे दर, इंधन अधिभार, सुरक्षा अधिभार, अमेरिकेचे सीमाशुल्क अधिभार, युद्धाच्या धोक्यासाठीचे अधिभार, कमिशन, सूट, क्रेडिट, परतावे अगर हवाई मालवाहतुकीच्या सेवांच्या किंमत अगर भरपाईच्या अन्य घटकांशी संबंधित आहेत) दावे, मग ते दावे कोणत्याही प्रकारच्या अगर देशाच्या अगर जगातील कोणत्याही अधिकारक्षेत्राच्या राष्ट्रीय, राज्यीय, स्थानिक, वैधानिक अगर सामान्य, किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या कायदा, नियम, अधिनियम यवर आधारित असले तरी, किंवा सर्व ज्ञात वा अज्ञात, शंका असलेले वा नसलेले, केलेले वा न केलेले, अपेक्षित वा अनपेक्षित, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, निकाली निघालेले अगर न निघालेले दावे जे मुक्तता करणा-या पक्षांनी कोणत्याही देशाच्या अगर जगातील कोणत्याही अधिकारक्षेत्राच्या न्यायालय वा व्यासपीठात केले असतील वा केले असते वा करु शकतील,

कोणत्याही वैधानिक तत्वांचे असले तरी व कोणत्याही प्रकारचे, रकमेचे वा नुकसानाचे असले तरी त्यांमधून कायमचे मुक्त केल्याचे धरले जाईल व जात आहे.

यामधील उल्लेखित कोणतीही गोष्ट दुर्लक्ष, करारभंग, सोडवणूक, पोहोचवण्यातील अपयश, हरवलेला माल, नुकसान झालेला अगर उशिरा पोहोचलेला माल याच्याशी संबंधित दाव्यांमधून किंवा हवाई मालवाहतुकीशी संबंधित तत्सम Warsaw Convention (वॉर्सा करारानुसार) केलेल्या अलग अलग दाव्यांमधून मुक्तता करत असल्याचे धरले जाणार नाही. तसेच यामधील उल्लिखित कोणतीही गोष्ट सप्टेंबर 30, 2006 नंतर झालेल्या वर्तनावर आधारित दाव्यांमधून मुक्तता करत असल्याचे धरले जाणार नाही. मुक्तता न केलेल्या सर्व दाव्यांबद्दलचे सर्व हक्क व युक्तिवाद Lufthansa स्पष्टपणे राखून ठेवत आहे.

मुक्तता करणारे पक्ष मुक्तता केल्या जाणा-या कोणत्याही पक्षांवर ऍक्शन्सशी संबंधित अगर मुक्तता केलेल्या दाव्यांशी [मागील परिच्छेदांमध्ये] संबंधित कोणत्याही प्रकारचे व्यवहार, प्रसंग, कृती करण्यातील अपयश अगर घटनेबद्दल खटला न भरण्याची हमी देत आहेत. हा परिच्छेद [Lufthansa] समझोता कराराची अंमलबजावणी करण्यासाठीच्या कोणत्याही कृतीला लागू होणर नाही. . . .

[उपरोल्लिखित मुक्तता व हमी] म्हणजे मुक्तता करणा-या पक्षांनी संपूर्ण व अंतिमतः केलेली मुक्तता आहे.

ही सुटका म्हणजे … Section 1542 of the California Civil Code (कॅलिफोर्निया सिव्हिल कोडचे कलम 1542) व Section 20-7-11 of the South Dakota Codified Laws (दक्षिण डाकोटा कोडिफाईड कायद्यांचे कलम 20-7-11) चा अधित्याग आहे, या प्रत्येकात तरतूद आहे की "सर्वसाधारण अधित्याग अशा दाव्यांना लागू होत नाही की जे घेणेक-याला मुक्तता देत असताना, आपल्याला येणे असल्याचे माहित नसते किंवा तशी शंका नसते, जे त्याला माहित असते तर देणेक-याबरोबरच्या त्याच्या हिशोबपूर्तीवर लक्षणीय परिणाम झाला असता", अन्य कोणत्याही राज्य अगर लागू असलेल्या अधिकारक्षेत्राच्या कोणत्याही तत्सम तरतूद, कायदा, नियम, अधिनियम अगर कायद्याच्या तत्वाचा अधित्याग आहे. या परिच्छेदात दिलेल्या अधित्याग आणि सोडून देणे या संबंधात वादी व समझोत्याच्या क्लासचा प्रत्येक सदस्य मान्य करतो की त्यांना कल्पना आहे, की यापुढील काळात त्यांना अशी सत्ये माहित होतील अगर सापडतील की जी [Lufthansa] समझोता कराराच्या मुख्य विषयाच्या संबंधात त्यांना विश्वास अगर माहित असलेल्या सत्यांपेक्षा वेगळी अथवा व्यतिरिक्त असतील, पण त्यांचा उद्देश आहे की … [वर दिलेल्या मुक्ततेमध्ये] मुक्त केलेले सर्व दावे पूर्णपणे, कायमचे मुक्त करायचे, आणि अशा उद्देशाला साहाय्य म्हणून ही मुक्तता अशी कोणतीही वेगळी अगर व्यतिरिक्त सत्ये सापडली तरी लागू राहील.

* * * * *

Lufthansa समझोता करार त्यामध्ये दिलेल्या दाव्यांव्यतिरिक्त कोणत्याही दाव्यांबाबत समझोता करत नाही. Lufthansa समझोत्याच्या क्लासच्या सदस्याचे, भूतपूर्व, वर्तमान अगर भावी प्रतिवादी अगर संगनमतात सहभागी व्यक्ती, Lufthansa चा कोणीही पूर्वीचा कर्मचारी, अधिकारी अगर संचालक ज्याने समझोत्याच्या क्लासच्या वकिलांच्या मुलाखती, निवेदने अगर प्रतिज्ञापत्रे, डिपोझिशन्स अगर खटल्याच्या साक्षीसाठीच्या सर्व योग्य विनंत्यांना सहकार्य न करण्याचे निष्पन्न झाले आहे, अगर मुक्तता केल्या गेलेल्या पक्षांव्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तींविरुद्धचे अधिकार वादी व Lufthansa समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांनी स्पष्टपणे राखून ठेवले आहेत.

## III. कॅनेडियन क्लास ऍक्शन

या मेलिंगमध्ये Lufthansa बरोबरच्या कॅनेडियन क्लास ऍक्शनबद्दलची एक नोटीस अंतर्भूत आहे ("कॅनेडियन Lufthansa समझोता"). कॅनेडियन Lufthansa समझोता यांच्याशी संबंधित आहेः ज्यांनी मालाच्या अग्रेषकांमार्फत हवाई मालवाहतूक सेवा खरेदी केल्या असतील त्यांच्यासह अशा सर्व व्यक्ती व संस्था ज्यांनी जानेवारी 1, 2000 ते सप्टेंबर 11, 2006 या कालावधीमध्ये कोणत्याही हवाई मालवाहतुकदाराकडून कॅनडाअंतर्गत, कॅनडामध्ये अगर कॅनडामधून मालवाहतुकीसाठी हवाई मालवाहतुक सेवा खरेदी केल्या होत्या.

मात्र, कॅनडामधून अमेरिकेत व अमेरिकेतून कॅनडात पाठवलेल्या मालाच्या हवाई वाहतुकीचे नियंत्रण येथे वर्णिलेल्या अमेरिका Lufthansa समझोत्याद्वारे होईल व कॅनेडियन Lufthansa समझोत्यादारे होणार नाही.

## IV. या समझोत्याअंतर्गत क्लासच्या सदस्यांना उपलब्ध असलेले पर्याय

### A. <u>Lufthansa समझोत्याच्या क्लासमध्ये राहणे व दाव्याचे प्रपत्र सादर करणे</u>

आपण अशी व्यक्ती अगर संस्था असाल की जी उपरोल्लिखित भाग I (C) मधील Lufthansa समझोत्याच्या क्लासच्या व्याख्येत बसते, तर आपण स्वतःला निष्कासित करण्याचे ठरवल्याशिवाय आपण Lufthansa समझोत्याच्या क्लासचे सदस्य व्हाल. Lufthansa समझोत्याच्या क्लासचे सदस्य म्हणून आपल्या हितसंबंधांचे प्रातिनिधिक वादी व समझोत्याच्या क्लासच्या वकिलांमार्फत प्रतिनिधित्व केले जाईल. मात्र आपण आपल्या खर्चाने स्वतःचा वकील नेमू शकता.

आपल्याला ही नोटीस टपालाने मिळाली असल्यास या नोटीसबरोबर आपल्याला दाव्याचे प्रपत्र आधीच मिळाले आहे. आपण ही नोटीस ऑनलाईन वाचत असल्यास अगर तिची प्रत आपल्याला Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) दाव्यांच्या प्रशासकांकडून टपालाऐवजी अन्य मार्गाने मिळाली असल्यास आपण दाव्याचे प्रपत्र www.aircargosettlement.com वर ऑनलाईन मागवू शकता अगर Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) दाव्यांच्या प्रशासकांना दूरध्वनी करुन मागवू शकताः अमेरिका अगर कॅनडा (विनामूल्य) 1 (800) 749-3518; अगर आंतरराष्ट्रीय (मूल्यसहित) 1 (941) 906-4822. हवाई मालवाहतुक समझोता च्या सर्व विनामूल्य व मूल्यसहित दूरध्वनी क्रमांकांची देशानुसार संपूर्ण सूची या नोटीसच्या मेलिंगमध्ये जोडली आहे, तसेच ही सूची ऑनलाईनही उपलब्ध आहे. तसेच आपण दाव्याचे प्रपत्र मागविण्यासाठी येथे दिलेल्या पत्त्यावर Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) च्या दावे प्रशासकाला पत्रही लिहू शकताः Air Cargo Settlement, c/o The Garden City Group, Inc., P.O. Box 9162, Dublin, OH 43017-4162, USA.

भरलेली दाव्याची प्रपत्रे Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) च्या दावे प्रशासकाला या पत्त्यावर परत पाठ्वावीः Air Cargo Settlement, c/o The Garden City Group, Inc., P.O. Box 9162, Dublin, OH 43017-4162, USA. ती फेब्रुवारी 12, 2009 नंतर पोस्टमार्क केलेली नसावीत. आपण वेळेवर, व्यवस्थित पत्त्यावर दाव्याचे प्रपत्र पाठवू शकला नाही तर आपला दावा नाकारला जाऊ शकतो व आपल्याला Lufthansa समझोता निधीमधून कोणतेही पैसे परत मिळू शकणार नाहीत.

## B. Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून स्वतःला निष्कासित करणे

Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून स्वतःला निष्कासित करण्यासाठी आपल्याला एक लेखी विनंती पाठवावी लागेल, ज्यात खालील गोष्टी स्पष्ट असाव्या:

**(1)** **आपले नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक;**

**(2)** **आपण अगर आपल्या व्यवसायाने वापरलेली सर्व व्यापारी नावे वा व्यावसायिक नावे व पत्ते, तसेच अशा सर्व मूळ कंपन्या, उपकंपन्या अगर संबंधित कंपन्या ज्यांनी जानेवारी 1, 2000 ते सप्टेंबर 11, 2006 या कालावधीमध्ये कोणत्याही वेळी हवाई मालवाहतुक सेवा खरेदी केल्या आहेत तसेच समझोत्याच्या क्लासेसमधून समाविष्टी मागे घेण्याची विनंती करत आहेत;**

**(3)** **ऍक्शनचे नाव (*In re Air Cargo Shipping Services Antitrust Litigation*) (*हवाई मालवाहतुक सेवांच्या मक्तेदारीविरोधीच्या खटल्यामध्ये*);**

**(4)** **"मी/आम्ही विनंती करतो की मला/आम्हाला *Air Cargo Shipping Services Antitrust Litigation* (*हवाई माल वाहतुक सेवांच्या मक्तेदारीविरोधी खटला*), *MDL 1775* Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून काढले जावे" असे स्वाक्षरी केलेले निवेदन; व**

**(5)** **आपल्याला विनंती करण्यात येते की आपण जानेवारी 1, 2000 ते सप्टेंबर 11, 2006 या कालावधीमध्ये कोणत्या हवाई मालवाहतुकदारांकडून हवाई मालवाहतूक सेवा खरेदी केल्या आहेत हे कळवावे व हवाई मालवाहतूक सेवांसाठी एकूण किती रक्कम खर्च केली याचा अंदाज करावा.**

Lufthansa समझोत्यामधून निष्कासित करण्याच्या विनंत्या फर्स्ट क्लास टपालाने येथे पाठवाव्या (सर्टिफाईड टपालाने आपण निष्कासित करण्याच्या विनंत्या पाठवाव्या अशी आपल्याला विनंती करण्यात येत आहे, पण तसे बंधनकारक नाही), त्यावर नोव्हेँबर 12, 2008 नंतरचा पोस्टमार्क नसावा:

**Air Cargo Settlement**
**c/o The Garden City Group, Inc.**
**P.O. Box 9162**
**Dublin, OH 43017-4162 USA**

**Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून निष्कासित केले जाण्यासाठी आपण जरी या खटल्याचा विषय असलेल्या कृतीमधून उत्पन्न होणा-या दाव्यांवर आधारुन कोणत्याही प्रतिवादींविरुद्ध खटला दाखल केला असेल अगर करावयाचा असेल, तरी येथे दिल्यानुसार वेळेवर निष्कासनाची विनंती आपण केली पाहिजे.**

आपण स्वतःला Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून निष्कासित केले तर आपणावर Lufthansa समझोता करार बंधनकारक राहणार नाही व आपण Lufthansa च्या विरोधातील सर्व दाव्यांचा पाठपुरावा स्वतंत्रपणे, आपल्या खर्चाने करु शकता. मात्र आपण स्वतःला निष्कासित केले तर आपण Lufthansa समझोता निधीमध्ये वाटा मागू शकणार नाही. निष्कासनाबद्दलची माहिती समझोत्याच्या या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे: www.aircargosettlement.com.

C. <u>समझोत्याच्या अटींना आक्षेप घेणे</u>

आपण Lufthansa समझोता करारातून निष्कासनाची विनंती केली नसल्यास जर आपण समझोत्यावर आक्षेप घेतला तर आपण स्वतः अगर वकिलामार्फत (आपल्या खर्चाने) न्याय्यता सुनावणीला हजर राहून न्यायालय जे योग्य व सुसंगत समजेल ते पुरावे आणि युक्तिवाद सादर करु शकता.

न्यायालयाने आपल्या आक्षेपांवर विचार करायचा असल्यास आपण खालील गोष्टी असलेला लेखी आक्षेप सादर केला पाहिजे:

(1) **हजर राहण्याची इच्छा असल्याची नोटीस;**
(2) **Lufthansa समझोत्याच्या क्लासच्या सदस्यत्वाचा पुरावा; व**
(3) **आक्षेपाचे निश्चित मुद्दे व आपल्याला हजर राहून युक्तिवाद का करावयचा आहे याची कारणे, तसेच न्यायालयाने विचार करावा असे आपल्याला वाटत असलेले सर्व कागदपत्र व साहित्य.**

असे लेखी आक्षेप नोव्हेंबर 12, 2008 पूर्वी न्यायालयात सादर करावे तसेच समझोत्याच्या क्लासच्या वकिलांना व Lufthansa च्या वकिलांना खाली विभाग VII मध्ये दिलेल्या पत्त्यांवर टपालाने पाठवावे. जो कोणी या पद्धतीने आक्षेप घेऊ शकणार नाही त्याने सर्व आक्षेपांचा अधित्याग केल्याचे मानले जाईल व अन्यथा त्याला न्यायालयाने चांगल्या उद्देशासाठी माफी केल्याशिवाय त्याला ऍक्शनमध्ये अगर अन्य कोणत्याही कृती अथवा कारवाईत असे आक्षेप घेण्यास कायमची बंदी होईल.

D. <u>काहीही न करणे</u>

Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून आपण स्वतःला निष्कासित केले नाही व दाव्याचे प्रपत्र सादर केले नाही, तर आपण तर Lufthansa समझोता निधीमधून पैसे मिळण्यास पात्र ठरणार नाही व आपण Lufthansa ला मुक्ततेमधे वर्णिलेल्या सर्व दाव्यांमधून मुक्त कराल.

## V. PLAN OF ALLOCATION (वाटणीची योजना)

न्यायालयाने समझोता निधीच्या वाटणीची योजना मान्य केली आहे (Lufthansa समझोत्याच्या सदस्यांना न्यायालयाने मान्य केलेली वकिलांची फी व खटल्याचा खर्च परत देऊन; Lufthansa समझोता निधीच्या कर व करसंबंधी खर्च काही असल्यास देऊन; या नोटीसमधील भाग II (B) नुसार वजावटी करुन; आणि समझोता कराराच्या परिच्छेद 61 नुसार काही आर्बिट्रेशन खर्च असल्यास ते देऊन बाकी रक्कम). पुढे Plan of Allocation ("POA") (वाटणीच्या योजनेचा ("पीओए")) गोषवारा दिला आहे.

Lufthansa समझोता निधीची वाटणी (वर दिल्यानुसार न्यायालयाने मान्य केलेली वकिलांची फी व खटल्याचा खर्च परत देऊन व अन्य प्रमाणित खर्च दिल्यावर) Lufthansa क्लासचे जे सदस्य वैध दाव्यांची प्रपत्रे सादर करतील त्यांमध्ये कसा वाटावा ते POA (पीओए) नेमून देते. POA (पीओए) मध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा दोन्ही खर्चांचा विचार केला आहे. वर भाग I (C) मध्ये दिल्यानुसार, "हवाई मालवाहतूक सेवा" म्हणजे अमेरिकेअंतर्गत, अमेरिकेमध्ये व अमेरिकेमधून हवाई माल वाहतुकीसाठीच्या सेवा. कोणाही Lufthansa क्लासच्या सदस्याच्या वसुलीच्या प्रमाणानुसार वाट्याचा हिशोब करण्यासाठी डॉलर सोडून अन्य चलनांमध्ये केलेल्या खरेदीच्या रकमांचे रुपांतर समझोता दाव्यांच्या प्रशासकाकडून सप्टेंबर 11, 2006 रोजी असलेल्या दरांनुसार डॉलरमध्ये केले जाईल.

**A. <u>व्याख्या</u>**

हवाई मालवाहतुक सेवांची **<u>थेट खरेदी</u>** म्हणजे त्रयस्थ पक्षाचा वापर न करता कोणाही हवाई मालवाहतुकदाराकडून कोणा व्यक्तीने थेट खरेदी केलेल्या अशा सेवा. उदा., जर एखाद्या उत्पादकाने हवाई मालवाहतूक सेवांसाठी कोणाही हवाई मालवाहतुकदाराला पैसे दिले, तर त्याने थेट खरेदी केली आहे. एखाद्या मालाच्या अग्रेषकाने हवाई मालवाहतूक सेवांसाठी कोणाही हवाई मालवाहतुकदाराला पैसे दिले, तर त्याने थेट खरेदी केली आहे.

हवाई मालवाहतुक सेवांची **<u>अप्रत्यक्ष खरेदी</u>** म्हणजे अशा सेवांची एखाद्या व्यक्तीने केलेली कोणतीही खरेदी ज्यात खरेदीदाराची हवाई मालवाहतूक सेवांसाठीची अदायगी हवाई मालवाहतुक सेवा पुरवणारा सोडून अन्य व्यक्ती अगर संस्थेला केली जाते. उदा., जर एखाद्या उत्पादकाने हवाई मालवाहतूक सेवांची व्यवस्था मालाच्या अग्रेषकामार्फत करुन त्याला पैसे दिले तर त्याने अप्रत्यक्ष खरेदी केली आहे.

हवाई मालवाहतूक सेवांची खरेदी अमेरिके*मधून* अगर अमेरिके*अंतर्गत* मालवाहतुकीसाठी असल्यास ती **<u>बहिर्गामी</u>** खरेदी आहे. हवाई मालवाहतुक सेवांची खरेदी अमेरिके*मध्ये* मालवाहतुकीसाठी असल्यास ती **<u>अंतर्गामी</u>** खरेदी आहे.

हवाई मालवाहतूक सेवांचा **<u>अमेरिकन खरेदीदार</u>** म्हणजे अमेरिकेतील निवासी खरेदीदार. हवाई मालवाहतूक सेवांचा **<u>परदेशी खरेदीदार</u>** म्हणजे अमेरिकेबाहेर निवासी खरेदीदार.

**B. <u>वितरण – थेट खरेदी</u>**

POA (पीओए) Lufthansa समझोता निधीपैकी (वर दिल्यानुसार न्यायालयाने मान्य केलेली वकिलांची फी व खटल्याचा खर्च परत देऊन व अन्य प्रमाणित खर्च दिल्यावर) 82% रक्कम हवाई मालवाहतूक सेवांच्या थेट खरेदीदारांसाठी नेमून देत आहे ("थेट निधी"). थेट निधी मधील Lufthansa क्लासच्या सदस्याच्या वाट्याच्या हिशोबासाठी अंतर्गामी (म्हणजे अमेरिकेमध्ये) हवाई मालवाहतूक सेवांच्या खरेदीचे मूल्यांकन अशा खरेदीच्या डॉलरमधील रकमेच्या 1.625 पट केले जाईल. बहिर्गामी हवाई मालवाहतूक सेवांसाठी (म्हणजे अमेरिकेमधून अगर अंतर्गत) असा गुणक लागू होणार नाही. सर्व अमेरिकन व परदेशी थेट खरेदीदारांच्या प्राथमिक वाट्यांचा (म्हणजे हवाई मालवाहतूक सेवांच्या खरेदीचे डॉलरमधील मूल्य) हिशोब केल्यावर POA (पीओए) नुसार समझोत्याचे प्रशासक थेट खरेदीदार असलेल्या दावेदारांचे दोन गटात विभाजन करतील: अमेरिकन थेट खरेदीदार व परदेशी थेट खरेदीदार. अमेरिकन थेट खरेदीदार गटातील थेट खरेदीदारांना नेमून दिलेले प्राथमिक वाटे अंतिम होतील. अमेरिकन थेट खरेदीदारांच्या प्राथमिक वाट्यांनी बनलेला थेट निधीचा भाग ज्यांनी वैध दाव्याची प्रपत्रे सादर केली होती अशा अमेरिकन थेट खरेदीदारांना त्यांच्या ठरलेल्या खरेदीच्या रकमांच्या सम प्रमाणात वाटून दिला जाईल.

परदेशी थेट खरेदीदार दावेदारांना नेमून दिलेले प्राथमिक भाग एकत्र करुन परदेश निधी बनवला जाईल. परदेश निधीचे पुढील निर्धारण असे होईल: परदेशी थेट खरेदीदारांना 85% ("परदेश थेट निधी") व परदेशी अप्रत्यक्ष खरेदीदारांना 15% ("परदेश अप्रत्यक्ष निधी"). परदेश थेट निधी व परदेश अप्रत्यक्ष निधीमधील Lufthansa क्लासच्या सदस्यांच्या वाट्याच्या हिशोबासाठी अंतर्गामी (म्हणजे अमेरिकेमध्ये) हवाई मालवाहतूक सेवांच्या खरेदीचे मूल्यांकन अशा खरेदीच्या डॉलरमधील रकमेच्या 1.625 पट केले जाईल. बहिर्गामी हवाई मालवाहतूक सेवांसाठी (म्हणजे अमेरिकेमधून अगर अंतर्गत) असा गुणक लागू होणार नाही. परदेशी थेट खरेदीदारांच्या हवाई मालवाहतूक सेवांच्या खरेदीच्या रकमा निश्चित केल्यावर अशा वसुलीची नेमून दिलेली टक्केवारी परदेश निधीमधून ज्यांनी वैध दाव्याची प्रपत्रे सादर केली होती अशा परदेशी थेट खरेदीदारांना त्यांच्या ठरलेल्या खरेदीच्या रकमेच्या प्रमाणात वाटून दिली जाईल.

C. <u>वितरण – अप्रत्यक्ष खरेदी</u>

वर दिल्याप्रमाणे POA (पीओए) नुसार हवाई मालवाहतूक सेवांच्या खरेदीची परदेशी अप्रत्यक्ष खरेदीदारांची रक्कम निश्चित केल्यावर अशा वसुलीची नेमून दिलेली टक्केवारी परदेश अप्रत्यक्ष निधीमधून ज्यांनी वैध दाव्याची प्रपत्रे त्यांच्या खरेदीच्या सादर केली होती अशा परदेशी अप्रत्यक्ष खरेदीदारांना त्यांच्या ठरलेल्या खरेदीच्या रकमेच्या प्रमाणात वाटून दिली जाईल. न्यायालयाने ठरविल्यानुसार सर्व परदेशी अप्रत्यक्ष खरेदीदारांना पैसे दिल्यावर परदेश अप्रत्यक्ष निधीमध्ये उरलेली रक्कम परदेश थेट निधीमध्ये परदेशी थेट खरेदीदारांना वाटण्यासाठी जमा केली जाईल.

Lufthansa समझोता निधीमधील बाकी 18% (न्यायालयाने मान्य केलेल्या सत्व वकील फी व खर्च दिल्यानंतर) हा हवाई मालवाहतूक सेवांच्या अमेरिकन अप्रत्यक्ष खरेदीदारांसाठी नेमून देला आहे. Lufthansa समझोता निधीमधील Lufthansa क्लासच्या सदस्यांच्या हवाई मालवाहतूक सेवांच्या अमेरिकन अप्रत्यक्ष खरेदीदारांच्या वाट्याच्या हिशोबासाठी अंतर्गामी (म्हणजे अमेरिकेमध्ये) हवाई मालवाहतूक सेवांच्या खरेदीचे मूल्यांकन अशा खरेदीच्या डॉलरमधील रकमेच्या 1.625 पट केले जाईल. बहिर्गामी हवाई मालवाहतुक सेवांसाठी (म्हणजे अमेरिकेमधून अगर अंतर्गत) असा गुणक लागू होणार नाही. अप्रत्यक्ष खरेदीदारांच्या हवाई मालवाहतूक सेवांच्या खरेदीच्या डॉलरमधील रकमा निश्चित केल्यावर अशा वसुलीची नेमून दिलेली टक्केवारी अप्रत्यक्ष निधीमधून ज्यांनी वैध दाव्याची प्रपत्रे सादर केली होती अशा Lufthansa क्लासच्या सदस्यांना त्यांच्या ठरलेल्या खरेदीच्या रकमेच्या प्रमाणात वाटून दिली जाईल. अप्रत्यक्ष निधीमधून उरलेली रक्कम थेट निधीमध्ये थेट खरेदीदारांना वाटण्यासाठी जमा केली जाईल.

## VI. वकिलांची फी व खर्च

आजच्या तारखेपर्यंत या ऍक्शनमध्ये वादी व प्रस्तावित क्लासचे (Lufthansa समझोत्याच्या क्लाससहित) प्रतिनिधित्व करणा-या वकिलांना त्यांच्या सेवांसाठीचे पैसे अगर खर्चाची परतफेड मिळालेली नाही. आधी नमूद केल्यानुसार वकिलांच्या फीचे व खर्चाचे पैसे देण्यासाठी आपण वैयक्तिकरीत्या जबाबदार नाही. वकिलांच्या वेळेच्या व संपूर्णपणे संभाव्यतेवर आधारित फीच्या आधारे खटला चालवण्यातील धोक्याच्या भरपाईसाठी समझोत्याच्या क्लासचे वकील न्यायालयाला वकिलांच्या फीबद्दल अधिनिर्णय करण्याची विनंती करतील – जी रक्कम Lufthansa समझोता निधीमधून वजा करायची आहे – त्यांना वकिलांच्या फीबद्दल Lufthansa समझोता निधीच्या 30% रकमेपेक्षा जास्त दिली जावू नये, तसेच खटल्याचा प्रत्यक्ष खर्च म्हणून दिलेला परतावा 2.5 दशलक्ष डॉलरपेक्षा जास्त दिला जाऊ नये.

## VII. निष्पक्षपातदर्शक सुनावणी आणि आक्षेप घेण्याचा हक्क

न्यायालयाने United States District Court for the Eastern District of New York (अमेरिकन जिल्हा न्यायालयाच्या न्यूयॉर्क पूर्व जिल्ह्याचे न्यायालय) साठी डिसेंबर 12, 2008 रोजी सकाळी 11.30 वाजता दी सेरिमोनियल न्यायालय, United States Courthouse, 225 Cadman Plaza East, Brooklyn, NY 11201 येथे "निष्पक्षपातदर्शक सुनावणी" घ्यावयाचे ठरविले आहे. या निष्पक्षपातदर्शक सुनावणीच्या वेळी Lufthansa समझोता करार न्याय्य, योग्य व पुरेसा आहे अगर नाही यावर विचार केला जाईल. निष्पक्षपातदर्शक सुनावणीच्या वेळी न्यायालय क्लासच्या वकिलांनी केलेल्या वकील फी व खटल्याच्या खर्चाबद्दलच्या विनंतीवरही विचार करेल. कोणत्याही सुनावणीची वेळ व तारीख कोणत्याही सूचनेशिवाय पुढे सुरु ठेवली जाऊ शकते, आणि आपल्याला हजर राहायचे असल्यास आपण वेळ व स्थळाची निश्चिती करावी असे सुचवण्यात येत आहे.

आपण स्वतःला Lufthansa समझोत्याच्या क्लासमधून निष्कासित केले नाही तर आपण स्वतः अथवा अधिकृत केलेल्या वकिलांमार्फत हजर राहू शकता, आणि Lufthansa समझोता करार न्याय्य, योग्य व पुरेसा म्हणून मान्य करावा अगर करु नये याची कारणे दाखवू शकता. मात्र आपल्याला हजर राहावयाचे असल्यास ज्या कागदपत्रांवर न्यायालयाने विचार करावा असे आपल्याला वाटते त्यांबरोबर एक लेखी निवेदन सादर करावे

लागेल, व ते न्यायालयाला (न्यायालयाच्या लेखनिकाना उद्देशून, वर दिलेल्या पत्त्यावर) नोव्हेंबर 12, 2008 नंतर मिळता कामा नये, व ते Lufthansa साठीच्या समझोत्याच्या क्लासच्या वकिलांना येथे पाठवावे:

**Deutsche Lufthansa AG, Lufthansa Cargo AG,**
**व Swiss International Air Lines Ltd. साठीचे वकील**

| |
|---|
| Eric J. Mahr<br>Natalya K. Scimeca<br>**WILMER CUTLER PICKERING HALE AND DORR LLP**<br>1875 Pennsylvania Avenue, N.W.<br>Washington, D.C. 20006<br>(202) 663-6000<br>Eric.Mahr@wilmerhale.com<br>Natalya.Scimeca@wilmerhale.com |

**समझोत्याच्या क्लासचे वकील**

| | |
|---|---|
| Michael D. Hausfeld<br>**COHEN, MILSTEIN, HAUSFELD & TOLL P.L.L.C.**<br>1100 New York Avenue, N.W.,<br>Suite 500 West<br>Washington, D.C. 20005<br>(202) 408-4600<br>mhausfeld@CMHT.com | Hollis Salzman<br>**LABATON SUCHAROW LLP**<br>140 Broadway<br>New York, NY 10005<br>(212) 907-0700<br>hsalzman@labaton.com |
| Robert N. Kaplan<br>**KAPLAN FOX & KILSHEIMER LLP**<br>850 Third Avenue<br>New York, NY 10022<br>(212) 687-1980<br>rkaplan@kaplanfox.com | Howard J. Sedran<br>**LEVIN, FISHBEIN, SEDRAN & BERMAN**<br>510 Walnut Street<br>Philadelphia, PA 19106<br>(215) 592-1500<br>hsedran@lfsblaw.com |
| Henry A. Cirillo<br>**THE FURTH FIRM LLP**<br>225 Bush Street, 15th Floor<br>San Francisco, CA 94104<br>(415) 433-2070<br>hcirillo@furth.com | W. Joseph Bruckner<br>**LOCKRIDGE GRINDAL NAUEN P.L.L.P.**<br>100 Washington Avenue South, Suite 2200<br>Minneapolis, MN 55401<br>(612) 339-6900<br>wjbruckner@locklaw.com |
| Steven N. Williams (SW-6198)<br>**COTCHETT, PITRE & MCCARTHY**<br>840 Malcolm Road, Suite 200<br>Burlingame, CA 94010<br>(650) 697-6997<br>swilliams@cpmlegal.com | Christopher Lovell<br>**LOVELL STEWART HALEBIAN LLP**<br>500 Fifth Avenue, Suite 58<br>New York, NY 10110<br>(212) 608-1900<br>clovell@lshllp.com |

## VIII. पत्यामधील बदल

जर ही नोटीस आपल्याला दाव्याच्या प्रपत्रावर आधीच छापलेल्या पत्याऐवजी दुस-या पत्यावर मिळाली असली, तर कृपया आपली अद्ययावत माहिती ऑनलाईन www.aircargosettlement.com वर प्रविष्ट करा, किंवा Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) दाव्यांच्या प्रशासकाला येथे पत्राने कळवा:

**Air Cargo Settlement**
**c/o The Garden City Group, Inc.**
**P.O. Box 9162**
**Dublin, OH 43017-4162 USA**

## IX. AIR CARGO SETTLEMENT (हवाई मालवाहतुक समझोता) दाव्यांच्या प्रशासकाला

Lufthansa समझोत्याबाबत आधिक माहिती या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे: www.aircargosettlement.com. आपल्या प्रश्नाचे उत्तर संकेतस्थळावर मिळाले नाही, तर आपण Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) दाव्यांच्या प्रशासकांना ईमेलने संपर्क साधू शकता: administrator@aircargosettlement.com. आपण दूरध्वनीवरुनही Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) दाव्यांच्या प्रशासकाशी संपर्क साधू शकता. अमेरिका व कॅनडामध्ये आपण या विनामूल्य दूरध्वनीवर कॉल करु शकता: 1 (800) 749-3518. अमेरिका अगर कॅनडाच्या बाहेरून जर आपण या विनामूल्य दूरध्वनीवर कॉल केला तर मूल्य द्यावे लागते. अमेरिका व कॅनडाव्यतिरिक्त इतर ठिकाणांहून आपण या दूरध्वनीवर कॉल करु शकता: 1 (941) 906-4822. या दूरध्वनीवर कॉल केल्यास त्याचे पैसे द्यावे लागतात. जोडलेली Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) दाव्यांच्या प्रशासकांच्या विनामूल्य व मूल्यसहित दूरध्वनी क्रमांकांसाठीची देशानुसार सूची पहा. Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) दाव्यांच्या प्रशासकांना खालेल पत्यावर पत्रही लिहू शकता:

**Air Cargo Settlement**
**c/o The Garden City Group, Inc.**
**P.O. Box 9162**
**Dublin, OH 43017-4162 USA**

ही नोटीस अन्य अनेक भाषांमध्येही उपलब्ध आहे. आपल्याला हे साहित्य इंग्रजी सोडून एखाद्या अन्य भाषेमध्ये हवे असल्यास कृपया संकेतस्थळाला भेट द्या, माहिती पुरवणा-या दूरध्वनीवर कॉल करा, वरील पत्यावर Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) च्या दावे प्रशासकाला पत्र लिहा, अगर administrator@aircargosettlement.com येथे ईमेल पाठवा.

## X. अधिक माहिती

Lufthansa समझोता करार व या ऍक्शनमध्ये सादर केलेले इतर कागदपत्र ऑनलाईन www.aircargosettlement.com येथे उपलब्ध आहेत, व पाहण्यासाठी न्यायालयात कामकाजाच्या नेहमीच्या वेळातही उपलब्ध आहेत: न्यायालयाच्या लेखनिकांचे कार्यालय, United States District Court for the Eastern District of New York, 225 Cadman Plaza East, Brooklyn, NY 11201. आपल्याला या नोटीसबद्दल अगर Lufthansa समझोता कराराबद्दल काही प्रश्न असले तर आपण खातील पत्यांवर समझोत्याच्या क्लासच्या वकिलांशी लेखी संपर्क साधू शकता:

| | |
|---|---|
| Michael D. Hausfeld<br>**COHEN, MILSTEIN, HAUSFELD & TOLL P.L.L.C.**<br>1100 New York Avenue, N.W.,<br>Suite 500 West<br>Washington, D.C. 20005<br>(202) 408-4600<br>mhausfeld@CMHT.com<br><br>Robert N. Kaplan<br>**KAPLAN FOX & KILSHEIMER LLP**<br>850 Third Avenue<br>New York, NY 10022<br>(212) 687-1980<br>rkaplan@kaplanfox.com<br><br>Henry A. Cirillo<br>**THE FURTH FIRM LLP**<br>225 Bush Street, 15th Floor<br>San Francisco, CA 94104<br>(415) 433-2070<br>hcirillo@furth.com<br><br>Steven N. Williams (SW-6198)<br>**COTCHETT, PITRE & MCCARTHY**<br>840 Malcolm Road, Suite 200<br>Burlingame, CA 94010<br>(650) 697-6997<br>swilliams@cpmlegal.com | Hollis Salzman<br>**LABATON SUCHAROW LLP**<br>140 Broadway<br>New York, NY 10005<br>(212) 907-0700<br>hsalzman@labaton.com<br><br>Howard J. Sedran<br>**LEVIN, FISHBEIN, SEDRAN & BERMAN**<br>510 Walnut Street<br>Philadelphia, PA 19106<br>(215) 592-1500<br>hsedran@lfsblaw.com<br><br>W. Joseph Bruckner<br>**LOCKRIDGE GRINDAL NAUEN P.L.L.P.**<br>100 Washington Avenue South, Suite 2200<br>Minneapolis, MN 55401<br>(612) 339-6900<br>wjbruckner@locklaw.com<br><br>Christopher Lovell<br>**LOVELL STEWART HALEBIAN LLP**<br>500 Fifth Avenue, Suite 58<br>New York, NY 10110<br>(212) 608-1900<br>clovell@lshllp.com |

**न्यायाधीश अगर न्यायालयाच्या क्लार्कशी संपर्क साधू नका**

**तारीख: एप्रिल 4, 2008**

**न्यायालयाच्या हुकुमानुसार**

____________________________________

Clerk of Court
United States District Court
for the Eastern District of New York
United States Courthouse
225 Cadman Plaza East
Brooklyn, NY 11201

| | |
|---|---|
| NUTECH BRANDS INC. v. (वि) AIR CANADA CARGO et al (एट ऑल) | Ontario Superior Court of Justice (ऑंटारिओचे सुपीरियर न्यायालय) Court File No. 50389CP (कोर्ट फाईल क्र. 50389CP) |
| KAREN McKAY v. (वि) ACE AVIATION HOLDING INC. et al (एट ऑल) | Supreme Court of British Columbia (ब्रिटिश कोलंबियाचे सर्वोच्च न्यायालय) Vancouver Registry No. S-067490 (व्हॅंकुव्हर पंजीकरण क्र. S-067490) |
| CARTISE SPORTS INC. v. (वि) DEUTSCHE LUFTHANSA AG et al (एट ऑल) | Québec Superior Court (क्युबेकचे सुपीरियर न्यायालय) 500-06-000344-065 |

# प्रस्तावित समझोत्याची नोटीस

कॅनेडियन क्लास ऍक्शंस व प्रतिवादी
DEUTSCHE LUFTHANSA AG, LUFTHANSA CARGO AG,
व SWISS INTERNATIONAL AIR LINES LTD. यांच्यामधील

## ही नोटीस आपल्या अधिकारांवर परिणाम करु शकते कृपया काळजीपूर्वक वाचा

**प्रति: ज्यांनी मालाच्या अग्रेषकांमार्फत हवाई मालवाहतुक सेवा खरेदी केल्या असतील त्यांच्यासह अशा सर्व व्यक्ती व संस्था ज्यांनी जानेवारी 1, 2000 ते सप्टेंबर 11, 2006 या कालावधीमध्ये कोणत्याही हवाई मालवाहतुकदाराकडून कॅनडाअंतर्गत, कॅनडामध्ये अगर कॅनडामधून मालवाहतुकीसाठी (कॅनडा व अमेरिका यादरम्यानची मालवाहतुक वगळून) हवाई मालवाहतुक सेवा खरेदी केल्या होत्या.**

ही नोटीस आपल्याला उद्देशून आहे कारण कॅनडामध्ये प्रलंबित असलेल्या Deutsche Lufthansa AG, Lufthansa Cargo AG, व Swiss International Air Lines Ltd. यांच्याविरुद्धच्या काही विशिष्ट क्लास ऍक्शन खटल्यांमुळे आपल्या वैधानिक अधिकारांवर परिणाम होऊ शकतो. (या नोटिसमध्ये सर्वत्र या तीन कंपन्यांना "Lufthansa" या नावाने उल्लेखित केले जाईल). हे खटले काही वादींनी आपल्या व आपल्या क्लासच्या अन्य सदस्यांच्या वतीने, ज्यांनी Lufthansa कडून कॅनडाअंतर्गत, कॅनडामध्ये अगर कॅनडामधून मालवाहतुकीसाठी (कॅनडा व अमेरिका यादरम्यानची मालवाहतुक वगळून) हवाई मालवाहतुक सेवा खरेदी केल्या होत्या, दाखल केले होते. हे खटले आरोप करतात की Lufthansa ने अन्य अनेक हवाई मालवाहतुकदारांसह संगनमत करुन हवाई मालवाहतुक सेवेचे दर निश्चित करुन कॅनडाच्या स्पर्धाविषयक कायदा चा भंग केला. Lufthansa ने कॅनेडियन वादींसह एक समझोत्याचा करार केला आहे, ज्यामध्ये इतर बाबींसह Lufthansa ने कॅनेडियन क्लासेसना 5,338,000 अमेरिकन डॉलर्स देणे, आणि Lufthansa ने अशी माहिती पुरवणे की जी या क्लासेसना दर ठरवण्याच्या तथाकथित कटातील इतर हवाई मालवाहतुकदारांविरुद्धच्या त्यांच्या दाव्यांचा पाठपुरावा करण्यास मदत करेल, या गोष्टी अंतर्भूत आहेत.

असाच एक क्लास ऍक्शनचा खटला अमेरिकेत प्रलंबित आहे. अमेरिकेत अमेरिकन वादी व Lufthansa दरम्यान एक समझोत्याचा करार पूर्णावस्थेत पोहोचला आहे. आपण कॅनडा व अमेरिका यादरम्यानच्या मालवाहतुकीसाठी हवाई मालवाहतुक सेवा खरेदी केल्या असतील तर आपण अमेरिकन समझोता करारामध्ये एक क्लास सदस्य म्हणून अंतर्भूत आहात व आपण आपल्या अधिकारांवर कसा परिणाम होतो हे पाहण्यासाठी प्रस्तावित क्लास ऍक्शनच्या अमेरिकन

समझोता कराराची नोटीस वाचली पाहिजे. अमेरिकन समझोता करार व प्रस्तावित क्लास ऍक्शनच्या अमेरिकन समझोता कराराची नोटीस येथे उपलब्ध आहे: www.aircargosettlement.com.

## I. क्लास ऍक्शनचा खटला म्हणजे काय ?

क्लास ऍक्शंस हे असे खटले असतात की ज्यांमध्ये प्रातिनिधिक वादींद्वारे दाखल केलेल्या एकाच न्यायालयीन कामकाजामध्ये अनेक लोकांच्या दाव्यांचा व अधिकारांचा निर्णय होतो. यामुळे शेकडो किंवा हजारो लोकांनी त्याच प्रकारचे खटले दाखल करण्याची गरज उरत नाही, न्यायालयांना हे दावे अधिक कार्यक्षमतेने व कमी खर्चामध्ये सोडवणे शक्य होते, व समान दावे असलेल्या लोकांना समान वागणुक मिळण्याची खात्री होते. क्लास ऍक्शनमध्ये न्यायालयावर जबाबदारी असते की प्रातिनिधिक वादी व क्लासेसचे प्रतिनिधित्व करणारे वकील (येथे समझोते झाले असल्यामुळे "समझोत्याच्या क्लासचे वकील") यांच्या दाव्यांची सुनावणी व निर्णय निश्चितपणे निष्पक्षपाती असावे. समझोत्याच्या क्लासचे सदस्य हे समझोत्याच्या क्लासच्या वकीलांच्या खर्च अगर फीसाठी वैयक्तिकरीत्या जबाबदार नसतात, जे न्यायालयीन निर्णयानुसार ठरतात. या बाबतीत असे सर्व खर्च वा फी समझोता निधीमधून दिले जातील.

## II. कॅनेडियन क्लास ऍक्शन खटल्यांचा आढावा

सध्या तीन वेगवेगळ्या कॅनेडियन न्यायालयांमध्ये Lufthansa विरुद्ध क्लास ऍक्शन खटले प्रलंबित आहेत: Supreme Court of British Columbia (ब्रिटिश कोलंबियाचे सर्वोच्च न्यायालय), Ontario Superior Court of Justice (ऑंटारिओचे सुपीरियर न्यायालय), आणि Québec Superior Court (क्युबेकचे सुपीरियर न्यायालय) (एकत्रितपणे, "कॅनेडियन क्लास ऍक्शंस"). वादींचा आरोप आहे, की Lufthansa व अन्य प्रतिवादींनी हवाई मालवाहतुक सेवेचे दर ठरवणे, वाढवणे, तसेच राखणे अगर स्थिर ठेवणे यासाठी एकत्र येऊन संगनमत केले, ज्यात वाढीव अधिभार आकारणे, हवाई मालवाहतुक सेवेच्या दरांमध्ये सूट देणे बंद करणे अगर रोखण्याचे आपसात ठरवणे, व परतावा आणि ग्राहकांच्या विभागणीबद्दल समझोता करणे अंतर्भूत आहे. वादींचा आरोप आहे, की यामुळे त्यांना व कॅनेडियन क्लासच्या सदस्यांना, अशा तथाकथित वर्तनाच्या अनुपस्थितीमध्ये जेवढे खर्च करावे लागले असते, त्यापेक्षा हवाई मालवाहतुक सेवेसाठी मोठ्या प्रमाणावर जास्त पैसे खर्च करावे लागले.

कॅनेडियन क्लास ऍक्शंसचा संबंध मुख्यतः प्रतिवादींनी अतिरिक्त प्रमाणात लावलेल्या अधिभारांशी आहे. अधिभार म्हणजे हवाई मालवाहतुकदार सामान्य हवाई मालवाहतुक दरांव्यतिरिक्त जे अधिक भार, संभवतः हवाई मालवाहतुकदारांना येत असलेल्या बाह्यस्थित खर्चांपोटी ग्राहकांना लावतात, ते, ज्यात अंतर्भूत आहेत, उदाहरणार्थ, वाढीव इंधनखर्च अगर अमेरिकेत सप्टेंबर 2001 मध्ये झालेल्या हल्ल्यांनंतर अतिरिक्त सुरक्षेसाठीचा वाढीव खर्च. वादींचा आरोप आहे, की प्रतिवादींनी या अधिभारांचे दर निश्चित करण्यासाठी तसेच प्रतिवादींनी जमवलेले उत्पन्न निश्चित करण्यासाठी संगनमत केले.

Lufthansa व कॅनेडियन समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांच्या वकिलांनी, प्रतिवादींच्या कथित कृतीमुळे समझोत्याच्या क्लासच्या झालेल्या कथित नुकसानासंबंधाने स्वतंत्रपणे एक व्यापक शोधकार्य व आर्थिक विश्लेषण केले. वादींना यामुळे कॅनेडियन समझोता करार करण्यापूर्वी या प्रकरणातील दावे व युक्तिवादांबद्दल महत्वपूर्ण माहिती मिळाली.

## III. प्रस्तावित कॅनेडियन समझोता कराराचा गोषवारा

प्रस्तावित कॅनेडियन समझोता कराराचे पुढील वर्णन म्हणजे फक्त एक गोषवारा आहे कॅनेडियन समझोता करार हा या समझोत्यासाठी निर्मिलेल्या या संकेतस्थळावर पाहता येईल (www.aircargosettlement.com).

### A. <u>समझोता कराराची मान्यता प्रक्रिया</u>

कॅनेडियन समझोता करार प्रत्यक्षात येण्यापूर्वी त्याला तीनही कॅनेडियन न्यायालयांनी मान्यता दिली पाहिजे. प्रत्येक न्यायालय सार्वजनिक सुनावणी घेईल, ज्यात कॅनेडियन समझोता कराराला मान्यता का दिली जावी याबद्दल युक्तिवाद केले जातील. कॅनेडियन समझोता कराराची अंमलबजावणी ही U.S. Court (अमेरिकन न्यायालयात) अमेरिकन समझोता कराराला मान्यता मिळण्यावर अवलंबून आहे. U.S. Court (अमेरिकन न्यायालयात) अमेरिकन समझोता कराराला मान्यता मिळाली नाही, तर कॅनेडियन वादी व Lufthansa स्वतंत्रपणे कॅनेडियन समझोता करार रद्द करण्याचे ठरवू शकतात.

### B. <u>कॅनेडियन समझोता कराराचा आढावा</u>

#### 1. समझोत्याच्या क्लासचे सदस्यत्व व प्रतिनिधित्व

कॅनेडियन समझोता करारामुळे तीन समझोत्याचे क्लासेस निर्माण होतात. समझोत्याचा प्रत्येक क्लास एका न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येतो. त्यामुळे, ब्रिटिश कोलंबियातील निवासी वैधानिक व नैसर्गिक व्यक्ती ब्रिटिश कोलंबियाच्या समझोता क्लासमध्ये व Supreme Court of British Columbia (ब्रिटिश कोलंबियाचे सर्वोच्च न्यायालय)च्या अधिकारक्षेत्रात येतील ; क्युबेकमधील निवासी वैधानिक व नैसर्गिक व्यक्ती (यात 50 अगर कमी कर्मचारी असलेल्या कंपन्या अंतर्भूत आहेत) क्युबेकच्या समझोता क्लासमध्ये व Québec Superior Court (क्युबेकचे सुपीरियर न्यायालय)च्या अधिकारक्षेत्रात येतील ; आणि ब्रिटिश कोलंबियाच्या समझोता क्लासमध्ये अगर क्युबेकच्या समझोता क्लासमध्ये सदस्य असलेल्या वैधानिक व नैसर्गिक व्यक्ती सोडून इतर वैधानिक व नैसर्गिक व्यक्ती ऑंटारिओच्या समझोता क्लासमध्ये व Ontario Superior Court of Justice (ऑंटारिओचे सुपीरियर न्यायालय)च्या अधिकारक्षेत्रात येतील.

एकत्रितरीत्या, ब्रिटिश कोलंबियाचा समझोता क्लास, क्युबेकचा समझोता क्लास व ऑंटारिओच्या समझोता क्लासमध्ये अंतर्भूत आहेत:

> ज्यांनी मालाच्या अग्रेषकांमार्फत हवाई मालवाहतुक सेवा खरेदी केल्या असतील त्यांच्यासह अशा सर्व व्यक्ती व संस्था ज्यांनी जानेवारी 1, 2000 ते सप्टेंबर 11, 2006 या कालावधीमध्ये अमर्यादितपणे विशेषतः Lufthansa सहित सर्व प्रतिवादींसह कोणत्याही हवाई मालवाहतुकदाराकडून, कॅनडाअंतर्गत, कॅनडामध्ये अगर कॅनडामधून मालवाहतुकीसाठी (कॅनडा व अमेरिका यादरम्यानची मालवाहतुक वगळून) हवाई मालवाहतुक सेवा खरेदी केल्या होत्या. समझोत्याच्या क्लास(क्लासेस)मध्ये प्रतिवादी व त्यांचे मूळ कंपन्या, कर्मचारी, उपकंपन्या, संबंधित, अधिकारी व संचालक समाविष्ट नाहीत.

एका अगर अधिक समझोत्याच्या क्लासेसमध्ये सदस्य असण्यासाठी आपण जानेवारी 1, 2000 ते सप्टेंबर 11, 2006 या कालावधीमध्ये किमान एकदा हवाई मालवाहतुक सेवा खरेदी केली असली पाहिजे.

**अमेरिका व कॅनडादरम्यान हवाई मालवाहतुकीसाठी समझोत्याच्या कालावधीमध्ये केलेली हवाई मालवाहतुक सेवांची खरेदी अमेरिकन समझोता करारांतर्गत येते व कॅनेडियन समझोता करारांतर्गत येत नाही. जर आपण अमेरिका व कॅनडादरम्यान हवाई मालवाहतुकीसाठी हवाई मालवाहतुक सेवांची खरेदी केली असेल तर आपण अमेरिकन क्लास ऍक्शनचे सदस्य आहात व आपण आपल्या अधिकारांवर कसा परिणाम होतो हे पाहण्यासाठी प्रस्तावित क्लास ऍक्शनच्या अमेरिकन समझोता कराराची नोटीस वाचली पाहिजे.**

खालील वकिलांच्या फर्म्स कॅनेडियन समझोत्याच्या क्लासेससाठी वकील म्हणून आहेत ("कॅनेडियन समझोत्याच्या क्लासेससाठी वकील"): Siskinds[LLP], Sutts, Strosberg[LLP], Harrison Pensa[LLP], Camp Fiorante Matthews, व Liebman & Associés.

## 2. कॅनेडियन समझोता करारापासून समझोत्याच्या क्लासेसना मिळणारे लाभ

<u>कॅनेडियन समझोता निधी</u>: कॅनेडियन समझोता कराराच्या मर्यादेमध्ये Lufthansaने कॅनेडियन समझोत्याच्या क्लासेसच्यासाठी समझोता निधीमध्ये 5,338,00 अमेरिकन डॉलर देण्याचे मान्य केले आहे.

<u>सहकार्य</u>: कॅनेडियन समझोता कराराच्या अटींनुसार Lufthansa कॅनेडियन समझोत्याच्या क्लासच्या वकिलांना आणि/किंवा त्यांच्या तज्ज्ञांना, ज्यामध्ये अमेरिकन समझोत्याच्या क्लासचे वकील अमेरिकन समझोता कराराच्या अटींनुसार भाग घेतात जे कॅनेडियन समझोत्याच्या क्लासच्या वकिलांच्या मते संबंधित कालावधीमध्ये कॅनडाअंतर्गत, कॅनडामध्ये अगर कॅनडामधून चालणाऱ्या हवाई मालवाहतुक सेवांशी संबंधित असेल अशा कोणत्याही कामकाज, अभिसाक्ष्य, वकिलांच्या बैठका व मुलाखतींमध्ये सहभाग घेण्यचे अधिकार देते. Lufthansaने अमेरिकन समझोत्याच्या क्लासच्या वकिलांना जे काही सहकार्यात्मक साहित्य अगर माहिती पुरवली असेल वा पुरवील, अशी सर्व माहिती अगर साहित्य मिळण्याचा कॅनेडियन समझोत्याच्या क्लासेसना अधिकार आहे. याशिवाय Lufthansa कॅनेडियन समझोत्याच्या करारामध्ये दिलेल्या विशिष्ट अटींनुसार स्वखर्चाने आपले सध्याचे अगर माजी संचालक, अधिकारी व कर्मचारी मुलाखती, निवेदने आणि/किंवा प्रतिज्ञापत्रे, अभिसाक्ष्य व साक्षीसाठी खटल्याच्या वेळी पुरवेल. Lufthansa आपले माजी संचालक, अधिकारी व कर्मचारी मुलाखती, निवेदने आणि/किंवा प्रतिज्ञापत्रे, अभिसाक्ष्य व साक्षीसाठी उपस्थित ठेवण्याचे सर्व योग्य प्रयत्न करेल.

वर वर्णन केल्यानुसार Lufthansaने समझोत्याच्या क्लासेसच्या, ज्यांची नावे खटल्यांमध्ये सहभागी पक्ष म्हणून घातली आहे अशा प्रतिवादींविरुद्धच्या प्रचलित खटल्यासाठी सर्व व्यापक सहकार्य देण्याचे मान्य केले आहे.

Lufthansa कॅनेडियन समझोता कराराच्या अंमलबजावणीद्वारे कोणत्याही अवैध वर्तनाचा आरोप मान्य करत नाही. या प्रकरणांमध्ये समझोता झाला नसता तर Lufthansa ने वादींच्या दाव्यांविरुद्ध भरपूर युक्तिवाद केला असता.

## C. <u>मुक्तता</u>

**आपण जर स्वतःला कॅनेडियन क्लास ऍक्शंसमधून निष्कासित केले नाही, तर जेव्हा समझोता करार अंतिम स्वरुप घेईल तेव्हा आपण या प्रकरणाशी संबंधित सर्व दाव्यांमधून LUFTHANSA ला मुक्त कराल आणि आपल्यावर ही मुक्तता व/किंवा कॅनेडियन समझोत्याच्या करारातील खटला न भरण्याविषयीचे प्रतिज्ञापत्र बंधनकारक असेल. क्युबेकच्या समझोत्याच्या क्लासच्या ज्या सदस्यांनी कारवाई सुरु केली असेल अगर सुरु करतील व क्युबेकच्या क्लासमधून निष्कासनाच्या अंतिम तारखेपर्यंत अशी कारवाई बंद करणार नाहीत, त्यांनी स्वेच्छेने माघार घेतल्याचे गृहित धरण्यात येईल.**

**कॅनेडियन समझोत्याच्या करारातील अंतर्भूत मुक्तता पुढे दिली आहे:**

> ठरलेल्या तारखेला, आणि समझोत्याच्या रकमेच्या अदायगीच्या बदल्यात, आणि समझोता करारामध्ये दिलेल्या अन्य मूल्यसहित प्रतिफलाच्या मोबदल्यात, ज्यात (या करारामध्ये) समझोता करारामध्ये अंतर्भूत सहकार्यविषयक तरतुदींचे पुढेही पालन करण्याच्या Lufthansaच्या हमीचा अंतर्भावही आहे, मुक्तता करणाऱ्या पक्षांनी मुक्त केल्या गेलेल्या पक्षांना मुक्त केल्या गेलेल्या दाव्यांसंबंधीच्या अगर त्यातून निर्माण होणाऱ्या सर्व दाव्यांमधून कायमस्वरुपी मुक्त केले आहे असे समजले जाईल व ते याद्वारे तसे करत आहेत.

**"मुक्तता केले जाणारे पक्ष"** चा अर्थ, सामायिकपणे व पृथकपणे Lufthansa, व तिचे सर्व वर्तमान व पूर्वीचे, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष, भूतपूर्व, वारस, मूळ कंपन्या, उपकंपन्या, विभाग, संबंधित, वारसदार, प्रबंधक, प्रशासक, व कोणतेही व सर्व भूतपूर्व, वर्तमान व भावी अधिकारी, संचालक, भागधारक, भागीदार, प्रतिनिधी, वकील, नोकर, कर्मचारी व अधिन्यासी. उपरोल्लिखित असूनही "मुक्तता केले जाणारे पक्ष" मध्ये कोणाही प्रतिवादीचा समावेश नाही, जो पूर्वी अगर सध्या ऍक्शंसमध्ये उल्लिखित आहे अगर ज्याचे नाव भविष्यामध्ये ऍक्शंसमध्ये समाविष्ट असेल.

**"मुक्तता करणारे पक्ष"** चा अर्थ, सामायिकपणे व पृथकपणे, वादी व समझोत्याच्या क्लासचे सदस्य स्वतः व त्यांच्याद्वारे अगर त्यांच्यामार्फत वारसदार, प्रशासक, डिव्हायसी, भूतपूर्व, वारस, मूळ कंपनी, उपकंपनी, कोणत्याही प्रकारचा प्रतिनिधी, भागधारक, भागीदार, संचालक, कोणत्याही प्रकारे मालक, संबंधित, अधिन्यासी, प्रतिनिधी, कर्मचारी, कंत्राटदार वकील अगर विमादाता असल्याचा दावा करणारी कोणतीही व्यक्ती अगर वैधानिक व्यक्ती, ज्या खाली वर्णिलेल्या पद्धत व तारखेनुसार ऍक्शनसमधून वैधपणे व समयानुसार माघार घेणार नाहीत, आणि क्लासचे वकील स्वतः अथवा त्यांच्याद्वारे अगर त्यांच्यामार्फत वारसदार, प्रशासक, डिव्हायसी, भूतपूर्व, वारस, मूळ कंपनी, उपकंपनी, कोणत्याही प्रकारचा प्रतिनिधी, भागधारक, भागीदार, संचालक, कोणत्याही प्रकारे मालक, संबंधित, अधिन्यासी, प्रतिनिधी, कर्मचारी, कंत्राटदार वकील अगर विमादाता असल्याचा दावा करणारी कोणतीही व्यक्ती अगर वैधानिक व्यक्ती.

**"मुक्त केले जाणारे दावे"** चा अर्थ, हवाई मालवाहतुक सेवांचे दर अथवा मोबदल्यामधून उद्भवणारे अगर त्यांच्याशी कोणत्याही प्रकारे संबंधित दावे (विशेषतः अमर्यादपणे मालवाहतुकीचे दर, इंधन अधिभार, युद्धाच्या धोक्यापोटीचा अधिभार, दिशादर्शन अधिभार, कमिशन, कस्टम अधिभार, प्रेरणास्त्रोत, सूट, क्रेडिट्स व परतावे यांच्याशी कोणत्याही प्रकारे संबंधित) जे कोणत्याही देशाच्या अगर जगातील कोणत्याही अधिकारक्षेत्राच्या मध्यवर्ती अगर प्रादेशिक, वैधानिक अगर सामान्य कायदे, नियम, अधिनियमांवर आधारित असतील, ज्यात अंतर्भूत आहेत कोणतेही ज्ञात अगर अज्ञात, अंदाजित असलेले अगर अंदाजित नसलेले, प्रत्यक्ष अगर कशामुळे तरी अस्तित्वात येऊ शकणारे, व परिसमाप्त केलेले अगर न केलेले दावे (विशेषतः अमर्यादपणे मालवाहतुकीचे दर, इंधन अधिभार, सुरक्षा अधिभार, युद्धाच्या धोक्यापोटीचा अधिभार, दिशादर्शन अधिभार, कमिशन, कस्टम अधिभार, प्रेरणास्त्रोत, सूट, क्रेडिट्स व परतावे यांच्याशी कोणत्याही प्रकारे संबंधित), जे मुक्तता करणार्‍या पक्षांपैकी कोणीही, कोणत्याही देशातील अगर जगातील कोणत्याही अधिकारक्षेत्रातील कोणत्याही न्यायालय अथवा अन्य मंचावर, कोणतीही कायदेविषयक तत्वे असताना, आणि दावा केलेल्या भरपाईचा प्रकार अथवा रक्कम कितीही असताना केले असते अगर भविष्यात करु शकतील. येथे नमूद केलेली कोणतीही गोष्ट केवळ या समझोता कराराच्या अंमलबजावणीच्या तारखेनंतर झालेल्या वर्तनामुळे निर्माण झालेले कोणतेही दावे "मुक्त केल्या जाणार्‍या दाव्यां" मध्ये अंतर्भूत करत नाही.

कॅनेडियन समझोत्याच्या करारामध्ये मुक्तता अंतर्भूत असली तरी ज्या प्रदेशामध्ये एका अन्यायकारकाची मुक्तता म्हणजे इतर सर्व अन्यायकारकांची मुक्तता असते अशा भागांमधील निवासी समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांसाठी, कॅनेडियन समझोता करार तरतूद करतो की असे समझोत्याच्या क्लासचे सदस्य Lufthansa ला मुक्त करत नाहीत, तर त्याऐवजी या प्रकरणाशी संबंधित असा कोणताही दावा Lufthansa च्या विरोधात कोणत्याही अधिकारक्षेत्रात न करण्याची अगर तशी धमकी न देण्याची, दावा नव्याने न करण्याची, प्रचलित दावा पुढे सुरु न ठेवण्याची प्रतिज्ञापत्रे देतात व तशी हमी देतात.

कॅनेडियन समझोता करार या मुक्त केल्या जाणार्‍या दाव्यांव्यतिरिक्त Lufthansa च्या मुक्त केल्या गेलेल्या पक्षांविरोधात अन्य कोणत्याही दाव्यांच्या बाबतीत समझोता करत नाही. कोणत्याही समझोत्याच्या क्लासच्या

सदस्याचे, मुक्त केल्या गेलेल्या पक्षांव्यतिरिक्त भूतपूर्व, वर्तमान अगर भावी प्रतिवादी अगर संगनमतातील सहकारी अगर अन्य कोणाही व्यक्ती अगर वैधानिक व्यक्तीच्या विरोधातील सर्व अधिकार हे स्पष्टपणे वादी व कॅनेडियन समझोता क्लासच्या सदस्यांनी राखून ठेवले आहेत.

### D. कॅनेडियन समझोत्याच्या क्लासच्या वकिलांची फी व खर्च

कॅनेडियन समझोत्याच्या क्लासच्या वकिलांची फी, वितरण व कर हे न्यायालयांद्वारे ठरवले जातील व ते कॅनेडियन समझोता निधीमधून दिले जातील. कॅनेडियन समझोत्याच्या क्लासच्या वकिलांच्या फीची प्रस्तावित रक्कम कॅनेडियन समझोता निधीच्या 25%, अधिक ज्या दिवशी न्यायालये समझोत्यास मान्यता देतील तोपर्यंतची झालेली वितरणे व भरलेले कर या पेक्षा जास्त नसेल. याशिवाय, कॅनेडियन समझोत्याच्या क्लासचे वकील, कॅनेडियन समझोता निधीमधून कोणत्याही भविष्यकालीन विरोधी खर्चापोटी अधिकतम 500,000 कॅनेडियन डॉलरपर्यंत व भविष्यकालीन वितरणांपोटी अधिकतम 500,000 कॅनेडियन डॉलरपर्यंत अदायगी करण्याविषयी न्यायालयांमध्ये प्रस्ताव आणण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

## IV. आणखी माहिती व समझोत्याचे लाभ मिळण्यासाठी कशी नोंदणी करावी

कॅनेडियन समझोत्याच्या क्लासचे वकील कॅनेडियन समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांच्या भविष्यकालीन फायद्यासाठी कॅनेडियन समझोता निधी ट्रस्ट म्हणून राखून ठेवण्याचा प्रस्ताव मांडत आहेत. आपल्याला ही नोटीस टपालाने आली असेल तर पुढील माहिती आपल्याला टपालाने पाठवली जाईल याची खात्री करण्यासाठी आपण काहीही करण्याची आवश्यकता नाही. **मात्र आपल्याला ही नोटीस टपालाने आली नसेल, तर कॅनेडियन समझोता निधीच्या कोणत्याही भावी वितरणासहित पुढील माहिती आपल्याला टपालाने पाठवली जाईल याची खात्री करण्यासाठी आपण दावे प्रशासकाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.**

आपण www.aircargosettlement.com, वर ऑनलाईन नोंदणीप्रपत्र पूर्ण करुन ऑनलाईन नोंदणी करु शकता, अगर आपले नोंदणीप्रपत्र डाऊनलोड करुन पूर्ण करुन व ते या पत्त्यावर पाठवून नोंदणी करु शकता: Air Cargo Settlement, c/o The Garden City Group, Inc., P.O. Box 9162, Dublin, OH, 43017-4162, USA. नोंदणी करण्यासाठी आपण Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) ला दूरध्वनीही करु शकता: अमेरिका अगर कॅनडा(विनामूल्य) 1 (800) 749-3518 ; अगर आंतरराष्ट्रीय (मूल्यसहित) 1 (941) 906-4822. Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) च्या सर्व विनामूल्य व मूल्यसहित दूरध्वनी क्रमांकांची देशानुसार संपूर्ण सूची या नोटीसच्या मेलिंगमध्ये जोडली आहे, तसेच ही सूची ऑनलाईनही उपलब्ध आहे. तसेच आपण नोंदणी प्रपत्र मागवण्यासाठी येथे दिलेल्या पत्त्यावर Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) च्या दावे प्रशासकाला पत्रही लिहू शकता.

## V. एखाद्या क्लासमधून स्वतःचा सहभाग कसा मागे घ्यावा

आपण जर "स्वेच्छेने माघार" घेतली नाही, तर कॅनेडियन समझोता कराराला मान्यता मिळाल्यास त्याच्या अटी आपल्यावर बंधनकारक होतील. आपण कॅनेडियन समझोता क्लासेसमध्ये राहण्याचे ठरवले व माघार घेतली नाही, तर आपण स्पर्धाविषयक कायदा च्या भंगाच्या आरोपाखाली कोणतेही दावे अथवा कायदेशीर कारवाई लावू अगर सुरु ठेवू शकणार नाही, जसे दर ठरवणे, हवाई मालवाहतुकीसंबंधी बाजारातील कथित वर्तनाबद्दल कोणतेही दावे लावू अगर सुरु ठेवू शकणार नाही. भविष्यात कॅनेडियन क्लास ऍक्शंसमधून माघार घेण्याचा कोणताही अधिकार दिला जाणार नाही. आपण कॅनेडियन क्लास ऍक्शंसमधून माघार घेतल्यास आपल्याला कॅनेडियन समझोता करार अथवा समझोता न करणाऱ्या प्रतिवादींविरुद्ध भविष्यात मिळवलेल्या पुढील अन्य कोणत्याही निर्धारण अगर निर्णयामध्ये सहभागी होता येणार नाही.

<u>ओंटारिओ आणि/किंवा ब्रिटिश कोलंबिया समझोत्याचे क्लासेस</u>: आपल्याला यापैकी एखाद्या क्लासमधून माघार घ्यावयाची असल्यास आपण त्यासाठी खालील पत्त्यावर नोव्हेंबर 12, 2008 पूर्वी पोस्टमार्क केलेल्या सर्टिफाईड, पोचपावती मागवून, टपालखर्च आधी देऊन, पाठवलेल्या टपालाने तशी लेखी विनंती पाठवली पाहिजे:

**Air Cargo Settlement**
**c/o The Garden City Group, Inc.**
**P.O. Box 9162**
**Dublin, OH 43017-4162 USA**

<u>क्युबेक समझोत्याचा क्लास</u>: आपल्याला क्युबेक समझोत्याच्या क्लासमधून माघार घ्यावयाची असल्यास आपण त्यासाठी खालील पत्त्यावर नोव्हेंबर 12, 2008 पूर्वी पोस्टमार्क केलेल्या सर्टिफाईड, पोचपावती मागवून, टपालखर्च आधी देऊन, पाठवलेल्या टपालाने तशी लेखी विनंती पाठवली पाहिजे:

Clerk of the Superior Court of Québec
1 Notre-Dame Street East
Montréal, Québec H2Y 1B6

<u>आवश्यक माहिती</u>: कॅनेडियन क्लास ऍक्शंसमधून माघार घेण्याच्या सर्व विनंत्यांमध्ये खालील माहिती स्पष्ट दिलेली असली पाहिजे:

- आपले नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक
- आपण अगर आपल्या व्यवसायाने वापरलेली सर्व व्यापारी नावे वा व्यावसायिक नावे व पत्ते, तसेच अशा सर्व मूळ कंपन्या, उपकंपन्या अगर संबंधित कंपन्या ज्यांनी संबंधित कालावधीमध्ये कोणत्याही वेळी हवाई मालवाहतुक सेवा खरेदी केल्या आहेत तसेच समझोत्याच्या क्लासेसमधून समाविष्टी मागे घेण्याची विनंती करत आहेत
- प्रकरणाचे नाव (*Canadian Air Cargo Shipping Services Class Actions (कॅनेडियन हवाई माल वाहतुक सेवाविषयक क्लास ऍक्शंस)*)
- ज्यांमधून आपल्याला माघार घ्यायची आहे तो/(ते) क्लास/(क्लासेस)
- आपण जानेवारी 1, 2000 व सप्टेंबर 11, 2006 दरम्यान खरेदी केलेल्या सर्व हवाई माल वाहतुक सेवांचे मूल्य
- a signed statement that "मी/आम्ही विनंती करतो की मला आम्हाला *Canadian Air Cargo Shipping Services Class Action (*कॅनेडियन हवाई माल वाहतुक सेवाविषयक क्लास ऍक्शंस*)* मधील प्रस्तावित समझोत्याच्या क्लासमधून काढले जावे" असे स्वाक्षरी केलेले निवेदन.

**कॅनेडियन क्लास ऍक्शंसमधून निष्कासित केले जाण्यासाठी, जरी आपण स्वतः या खटल्यातील वर्तनामुळे निर्माण झालेल्या दाव्यांच्या आधारे प्रतिवादींपैकी कोणावरही खटला दाखल केला असला अगर आपल्याला करायचा असला, तरी आपण वर दिल्याप्रमाणे वेळेवर निष्कासनाची विनंती केली पाहिजे. क्युबेक समझोत्याच्या क्लास सदस्यांपैकी ज्यांनी कायदेशीर कारवाई सुरु केली असेल अगर सुरु करतील व क्युबेक क्लासमधून निष्कासनाच्या अंतिम मुदतीच्या आत अशी कारवाई बंद करु शकणार नाहीत, त्यांनी स्वेच्छेने माघार घेतली असे गृहित धरले जाईल.**

## VI. समझोत्याला मान्यतेसाठीची सुनावणी

आपल्यावर समझोत्याच्या मान्यतेसाठीच्या सुनावणीसाठी हजर राहण्याचे बंधन नाही.

कॅनेडियन समझोता करार मान्य करण्यासाठीच्या प्रस्तावावर Ontario Superior Court of Justice (ओंटारिओ सुपीरियर न्यायालय) लंडन शहरामध्ये जानेवारी 28, 2009 रोजी सकाळी 10:00 वाजता, Superior Court of Québec (क्युबेक सुपीरियर न्यायालय) मॉंट्रियल शहरामध्ये मार्च 9 व 10, 2009 रोजी सकाळी 9:00 वाजता, आणि Supreme Court of British Columbia (ब्रिटिश कोलंबियाचे सर्वोच्च न्यायालय) व्हॅंकुवर शहरामध्ये फेब्रुवारी 27, 2009 रोजी सकाळी 10:00 वाजता सुनावणी घेईल. समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांना सुनावण्यांना उपस्थित राहून कॅनेडियन समझोता करारासंबंधी आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. आपल्याला समझोत्याबद्दल मतप्रदर्शन करायचे असेल अगर आक्षेप नोंदवायचा असेल तर आपले लेखी म्हणणे खाली दिलेल्या प्रत्येक वकिलास नोव्हेंबर 12, 2008 पर्यंत पोहोचवले पाहिजे:

| | |
|---|---|
| क्युबेक समझोत्याच्या क्लासचे सदस्य सोडून अन्य समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांचे आक्षेप कॅनेडियन समझोत्याच्या क्लासच्या सहवकिलांकडे पाठवावे:<br><br>Charles M. Wright<br>Siskinds LLP<br>680 Waterloo Street<br>London, ON N6A 3V8<br>1-800-461-6166<br><br>क्युबेक समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांचे आक्षेप क्युबेक समझोत्याच्या क्लासच्या वकिलांकडे पाठवावे:<br><br>Irwin Liebman<br>Liebman Associés<br>1 Westmount Square #1500<br>Montreal, Québec H3Z 2P9<br>(514) 846-0666 | Robert E. Kwinter<br>Blake, Cassels & Graydon LLP<br>199 Bay Street<br>Suite 2800, Commerce Court West<br>Toronto, ON M5L 1A9<br>(416) 863-2400<br><br>Deutsche Lufthansa AG, Lufthansa Cargo AG, आणि Swiss International Air Lines Ltd. साठीचे कॅनेडियन वकील |

सर्व लिखित जबाब योग्य त्या न्यायालयाला पाठवले जातील व सर्व मिळालेल्या लिखित जबाबांवर योग्य त्या न्यायालयाद्वारे विचार होईल. आपण नोव्हेंबर 12, 2008 पूर्वी लिखित जबाब सादर केला नाही तर आपल्याला समझोत्याच्या मान्यतेच्या सुनावण्यांमध्ये तोंडी जबाब अगर अन्य पद्धतीने भाग घेण्याचा अधिकार राहणार नाही.

कोणत्याही सुनावणीची वेळ व तारीख कोणत्याही सूचनेशिवाय तशीच ठेवली जाऊ शकते अगर बदलली जाऊ शकते.

## VII. AIR CARGO SETTLEMENT (हवाई मालवाहतुक समझोता)विषयक दाव्यांचे प्रशासक

समझोत्याबद्दल अधिक माहिती www.aircargosettlement.com. या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेतस्थळावर एक ईमेल पत्ता आहे, तो वापरुन आपण Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता)विषयक दाव्यांच्या प्रशासकांशी संपर्क साधू शकता. आपण Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता)विषयक दाव्यांच्या प्रशासकांशी दूरध्वनीद्वारेही संपर्क साधू शकता: अमेरिका अगर कॅनडा(विनामूल्य) 1 (800) 749-3518 ; अगर आंतरराष्ट्रीय (मूल्यसहित) 1 (941) 906-4822. आपण अमेरिका अगर कॅनडाचे विनामूल्य क्रमांक त्या देशांच्या बाहेरील

ठिकाणावरुन लावल्यास आपल्याला पैसे पडतात. सर्व विनामूल्य व मूल्यसहित दूरध्वनी क्रमांकांची देशानुसार संपूर्ण सूची या नोटीसच्या मेलिंगमध्ये जोडली आहे, तसेच ही सूची www.aircargosettlement.com. वर ऑनलाईनही उपलब्ध आहे. तसेच आपण येथे दिलेल्या पत्त्यावर Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) च्या दावे प्रशासकाला पत्रही लिहू शकता.

Air Cargo Settlement
c/o The Garden City Group, Inc.
P.O. Box 9162
Dublin, OH 43017-4162 USA

ही नोटीस अन्य अनेक भाषांमध्ये उपलब्ध आहे. आपल्याला हे साहित्य इंग्रजी सोडून एखाद्या अन्य भाषेमध्ये हवे असल्यास कृपया संकेतस्थळाला भेट द्या, माहिती पुरवणाऱ्या दूरध्वनीवर कॉल करा, वरील पत्त्यावर Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) च्या दावे प्रशासकाला पत्र लिहा, अगर administrator@aircargosettlement.com येथे ईमेल पाठवा.

## VIII. अतिरिक्त माहिती

कॅनेडियन समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांच्या नाव अगर पत्त्यांमधील कोणतेही बदल न्यायालयाकडे पाठवू नयेत. ही नोटीस मिळाल्यानंतर जर आपले नाव आणि/किंवा पत्ता बदलला असेल तर हा बदल आपण Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता) च्या दावे प्रशासकाला कळवावा. ही गोष्ट आपण www.aircargosettlement.com वर ऑनलाईन करु शकता अथवा हवाई मालवाहतुक समझोता ला या पत्त्यावर पत्र पाठवू शकता: Air Cargo Settlement, c/o The Garden City Group, Inc., P.O. Box 9162, Dublin, OH 43017-4162 USA. तसेच आपण वर विभाग VII मध्ये सांगितलेल्या दूरध्वनी क्रमांकांवर Air Cargo Settlement (हवाई मालवाहतुक समझोता)विषयक दाव्यांच्या प्रशासकांना दूरध्वनीही करु शकता.

आपल्याला या नोटीसमधे असलेल्या समझोत्याच्या क्लासेसबद्दलच्या बाबींविषयी असलेल्या कोणत्याही शंका अगर प्रश्न खालीलप्रमाणे लेखी स्वरुपात कॅनेडियन समझोत्याच्या क्लासेसच्या वकिलांना पाठवता येतील:

| क्युबेक समझोत्याच्या क्लासचे सदस्य सोडून अन्य समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांनी येथे संपर्क साधावा: | क्युबेक समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांनी येथे संपर्क साधावा: |
|---|---|
| Charles M. Wright<br>Siskinds LLP<br>680 Waterloo Street<br>London, ON N6A 3V8<br>1-800-461-6166 | Irwin Liebman<br>Liebman Associés<br>1 Westmount Square #1500<br>Montreal, Québec H3Z 2P9<br>(514) 846-0666 |

या नोटीसमध्ये कॅनेडियन समझोता कराराचा फक्त गोषवारा आहे. कॅनेडियन समझोत्याच्या क्लासच्या सदस्यांना संपूर्ण समझोता करार वाचावा असे सुचवण्यात येत आहे, याची प्रत www.aircargosettlement.com वर विनामूल्य मिळू शकेल. खालील पत्त्यावर लिहिल्यास 20 डॉलर किंमतीला समझोत्याच्या दाव्यांच्या प्रशासकाद्वारे एक प्रत टपालाने पाठवलीही जाऊ शकेल: Air Cargo Settlement, c/o The Garden City Group, Inc., P.O. Box 9162, Dublin, OH 43017-4162 USA.

न्यायालयांशी संपर्क साधू नका.

**ही नोटीस ONTARIO SUPERIOR COURT OF JUSTICE (ऑंटारिओ सुपीरियर न्यायालय), SUPREME COURT OF BRITISH COLUMBIA (ब्रिटिश कोलंबियाचे सर्वोच्च न्यायालय), आणि QUÉBEC SUPERIOR COURT (क्युबेक सुपीरियर न्यायालय) यांनी अधिकृत केली आहे**